



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६४ वे * अंक १० * नांदेड * शुक्रवार, दि. १० जानेवारी २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## कारखान्याची चिमणी कोसळली, ९ जणांचा मृत्यू; २५ पेक्षा अधिक कामगार ढिगाऱ्याखाली अडकले



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** छत्तीसगडमधील मुंगेली येथे मोठी दुर्घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. स्मेल्टिंग प्लांटची चिमणी कोसळल्याने २५ कामगार ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. दरम्यान, या दुर्घटनेत आत्तापर्यंत ९ कामगारांचा मृत्यू झाला. ढिगाऱ्याखालून दोन मजुरांना बाहेर काढण्यात आले असून, जखमी मजुराला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासन व्यवस्थेने बचाव कार्याला सुरुवात केली आहे.

कारखान्याची चिमणी कोसळल्याने २५ पेक्षा अधिक कामगार ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती आहे. दरम्यान यामध्ये ९ जणांचा मृत्यू झाला. मात्र मृतांचा हा आकडा वाढण्याची शक्यता आहे. जखमी कामगारांवर जवळच्या रुग्णालयात उपचार केले जात आहे. लोखंड बनवण्याच्या कारखान्यातील सायलो स्ट्रक्चर कोसळल्याने हा अपघात झाला. मुंगेलीचे जिल्हाधिकारी राहुल देव याबाबत बोलताना म्हणाले, मुंगेली जिल्ह्यातील सरगाव येथील लोखंड बनवणाऱ्या कारखान्यातील सायलो स्ट्रक्चर कोसळल्याने कामगार अडकण्याची शक्यता आहे. जखमी मजुराला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलीस आणि प्रशासन घटनास्थळी दाखल झाले असून बचावकार्य सुरू आहे.

मुंगेलीचे एसपी भोजराम पटेल पुढे बोलताना म्हणाले, आम्हांला माहिती मिळाली होती की स्मेल्टिंग प्लांटमधील चिमणी आणि सायलोचा काही भाग कोसळला आहे आणि काही कामगार त्याखाली अडकले आहेत. जवळपास सर्वच विभागांचे कर्मचारी येथे आहेत. येथे ३-४ लोक अडकले असण्याची शक्यता आहे. ढिगारा काढून टाकल्यानंतर परिस्थिती स्पष्ट होईल. दोन जखमींना उपचारासाठी बिलासपूर येथील रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. मदत कार्य चालू आहे. घटनास्थळी तातडीने पोलीस आणि रेस्क्यू टीम पोहोचली आहे.

## पक्ष वगैरे न बघता दोषी आढळणाऱ्यावर कडक कारवाई करणार -अजित पवार

**मुंबई (प्रतिनिधी)–** बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघत आहे. अशात अनेक राजकीय नेत्यांसह समाजिक कार्यकर्त्यांनी या हत्येतील आरोपींचा धनंजय मुंडे यांच्याशी कथित संबंध असल्याचा आरोप करत, मुंडे यांच्या कॅबिनेट मंत्रिपदाच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. पुण्यात आज उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत विचारले असता ते म्हणाले, पक्ष वगैरे न बघता दोषी आढळणाऱ्यावर कडक कारवाई करणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आज पुणे दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. पत्रकारांनी त्यांना मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याविषयी विचारले. यावर अजित पवार म्हणाले, या हत्या प्रकरणाचा विविध तपास यंत्रणा तपास करत आहेत. त्याचबरोबर मुख्यमंत्र्यांनीही सांगितले आहे, या प्रकरणात कोणी दोषी असल्याचे सिद्ध झाले तर त्याच्यावर ताबडतोब कारवाई केली जाईल. मी सुद्धा देवेंद्र फडणवीस यांना भेटून सांगितले आहे की, पक्ष वगैरे न बघता यामध्ये वरिष्ठ पातळीवर काम करणारे कोणी दोषी असतील तर त्यांची गय करण्याचे कारण नाही. ही निर्घृण पद्धतीने झालेली हत्या आहे.

## तिरुपती बालाजी मंदिरात चेंगराचेंगरी; सहा भाविकांचा मृत्यू

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** तिरुपती बालाजीचं दर्शन घ्यावं, अशी देशभरातील लाखो भाविकांची इच्छा असते. दररोज हजारो भाविक तिरुपती मंदिरात जाऊन बालाजी दर्शन घेतातही. तिरुपतीचं बालाजी मंदिर हे जागृत देवस्थान आहे. पण याच मंदिरात आज अतिशय मन हेलावून टाकणारी घटना घडली आहे.

आंध्र प्रदेशमधील प्रसिद्ध तिरुपती मंदिरात वैकुंठद्वार दर्शनासाठी असलेल्या पास केंद्रावर चेंगराचेंगरी झाल्याने सहा भाविकांचा मृत्यू झाला आहे. आज सकाळपासूनच हजारो भाविक वैकुंठद्वार दर्शनाचे टोकन मिळवण्यासाठी तिरुपतीच्या विविध पास केंद्रांवर रांगेत उभे आहेत. या दरम्यान भाविकांना बैरागी पट्टीडा पार्क येथे पास घेण्यासाठी रांगेत उभं राहण्यास सांगितलं गेलं तेव्हा ही चेंगराचेंगरी झाली ज्यामध्ये सहा भाविकांचा मृत्यू झाला.

चेंगराचेंगरीनंतर परिसरात मोठा गोंधळ उडाला. त्यात सहा भाविकांचा मृत्यू झाला. यामध्ये मल्लिका नावाच्या एका महिलेचा समावेश आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तिरुपती पोलिसांनी प्रयत्न केले. त्यांनी थोड्याच वेळात परिस्थितीवर नियंत्रणही मिळवलं.

चेंगराचेंगरीत अनेक भाविक आजारी पडले, काहीजण बेशुद्धही पडल्याची माहिती आहे. जखमी झालेल्या भाविकांवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तिरुपती देवस्थान समितीने १०, ११ आणि १२ जानेवारी रोजी वैकुंठद्वार दर्शनाच्या पहिल्या तीन दिवसांसाठी १.२० लाख टोकन जारी करण्याचा निर्णय घेतला होता.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी चेंगराचेंगरीत भाविकांच्या मृत्यूबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. मुख्यमंत्री नायडू यांनी या घटनेतील जखमींवर करण्यात येत असलेल्या उपचारांबाबत अधिकाऱ्यांशी फोनवरून चर्चा केली. त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनास्थळी जाऊन मदत कार्य करण्याचे आदेश दिले आहेत, जेणेकरून जखमींना चांगले उपचार मिळू शकतील.

आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री वायएस जगन मोहन रेड्डी यांनीही सदर घटनेबाबत दुःख व्यक्त केलं आहे. मृतांच्या कुटुंबाबत माझ्या संवेदना आहेत. तसंच जे जखमी झाले आहेत त्यांना लवकर आराम मिळो अशी प्रार्थना मी करतो असंही जगन मोहन रेड्डी यांनी म्हटलं आहे.




## हृदय पिळवटणारी घटना; मुलाने गळफास घेतला, त्याच दोरखंडाने हातबल बापानेही आयुष्य संपवलं

**नांदेड (प्रतिनिधी)–** बाबा मला मोबाईल हवाय, नवीन कपडे हवेत, शाळेचं साहित्यही संपलं आहे, कधी घेऊन द्याल? जवळपास प्रत्येक घरात मुलाकडून वडिलांकडे अशी मागणी केली जाते. मुलाचा हा आणि असे असंख्य हट्ट पूर्ण करण्यासाठी बाप घाम गाळतो, काबाड कष्ट करतो.

एवढं सगळं करूनही काही वेळेला आर्थिक परिस्थितीमुळे बापाला मुलाचे हट्ट पूर्ण करणं शक्य होत नाही. बापाने असाच छोटासा हट्ट पूर्ण केला नाही, म्हणून मुलाने गळफास लावून स्वतःचं आयुष्य संपवलं आहे. यात आणखी धक्कादायक बाब म्हणजे मुलाने ज्या दोरखंडाने गळफास लावून घेतला, त्याच दोरखंडाने वडिलांनीही स्वतःला गळफास लावून घेतला आहे. नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यात मिनकी येथे ही मन हेलावून टाकणारी घटना घडली आहे.

४३ वर्षांचे अल्पभूधारक शेतकरी राजेंद्र पैलवार यांच्या शेतावर चार लाख रुपयांचं कर्ज होतं. कर्ज आणि सततची नापिकी यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे त्यांना कठीण जात होते. राजेंद्र पैलवार यांचा १६ वर्षांचा मुलगा ओंकार पैलवार हा उदगीर येथे शिक्षणाला होता. मकर संक्रातीनिमित्त तो गावाला आला होता.

गावाला आल्यानंतर ओंकारने वडिलांकडे नवीन कपडे, शैक्षणिक साहित्य आणि नवीन मोबाईलसाठी पैसे मागितले. पण पैसे नाहीत, थोडे दिवस थांब नंतर देतो, असं वडिलांनी सांगितलं. त्यामुळे नाराज झालेल्या ओंकारने टोकाचं पाऊल उचललं. ओंकारने शेतातील झाडाला गळफास लावून जीवन संपवलं.

मुलगा घरी न आल्यामुळे वडिलांनी शोधाशोध केली, तेव्हा शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन ओंकारने जीवन संपवल्याचं त्यांना दिसलं. हे पाहून हतबल झालेल्या वडिलांनी मुलान ज्या दोरखंडाने गळफास लावून घेतला, त्याच दोरखंडाने आणि त्याच झाडाला गळफास लावून घेऊन स्वतःची जीवनयात्रा संपवली.

## प्रदेशाध्यक्ष बदला, जयंत पाटलांसमोरच कार्यकर्त्यांची शरद पवारांकडे मागणी

**मुंबई (प्रतिनिधी)–** विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव झाल्यानंतर शरद पवारांच्या राष्ट्रवदीत प्रदेशाध्यक्ष बदलाची मागणी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी केली आहे. निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर पक्षाची पहिलीच बैठक मुंबईत पार पडली. या बैठकीत विधानसभा निवडणुकीतील पराभवाचे चिंतन करण्यात येत आहे. या बैठकीत पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नवीन प्रदेशाध्यक्ष करण्याची मागणी केली आहे. शरद पवारांसह सर्व ज्येष्ठ नेत्यांसमोरच कार्यकर्त्यानं ही मागणी केली. जयंत पाटील सध्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत.

मराठा समाजाव्यतिरिक्त प्रदेशाध्यक्ष करा अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी या बैठकीत शरद पवारांकडे केली आहे. वेळ देणारा प्रदेशाध्यक्ष असेही पदाधिकारी यावेळी म्हणाले. तसेच रोहित पवार आणि रोहित पाटील यांच्याकडे मोठी जबाबदारी द्यावी, अशी मागणी देखील बैठकीत झाली आहे. या कार्यकर्त्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## मनोज जरांगे पाटील आणि अंजली दमानिया यांच्यावर लातूर जिल्ह्यात तिसरा गुन्हा दाखल

**लातूर (प्रतिनिधी)–** मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील आणि सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्या विरोधात लातूर जिल्ह्यातील तिसरा गुन्हा दाखल झाला आहे. किनगाव, उदगीर ग्रामीण पाठोपाठ लातूर शहरातही गुन्हा दाखल करण्यात आला. ओबीसी समाज बांधवांनी शिवाजी नगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. गुन्हा दाखल होईपर्यंत ओबीसी समाजाने पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन केलं होतं. दरम्यान यानंतर मनोज जरांगे आणि अंजली दमानिया यांच्यावर शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबतचा अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची क्रूरपणे झालेली हत्या निषेधार्य आहे. या घटनेतील दोषींवर कडक कारवाई झालीच पाहिजे. मात्र या घटनेचा आधार घेत मनोज जरांगे पाटील आणि अंजली दमानिया हे सातत्याने वंजारी समाजावर टीका करत आहेत. समाजाचे नेते धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्यावर आरोप करत आहेत. एवढेच नाही तर समाजातील अधिकारी, कर्मचारी यांना लक्ष केलं जात आहे. वंजारी समाजाबद्दल जातीय तेढ निर्माण होईल, असं वक्तव्य केलं जात आहे. यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो अशा आशयाची तक्रार गोविंद केदार यांनी लातूर शहरातील शिवाजी नगर पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यानुसार मनोज जरांगे पाटील आणि अंजली दमानिया यांच्या विरोधात शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अर्धापूर-लहान-तामसा रोडवर वाहनाने उडवले; विद्यार्थ्याचा मृत्यू

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** अर्धापूर-लहान-तामसा रस्त्याने जात असतांना रस्त्याच्या कडेला उभा असलेला मुलाला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने अपघातात त्या मुलाचा मृत्यू झाला आहे. ही घटना गुरुवार, दि. ९ जानेवारी रोजी सकाळी घडली आहे.



अर्धापूर - लहान - तामसा रोडवर हमरापूर येथील शेतकरी कचरू अडकिणे, चुलता सोबत श्रीनिवास अडकिणे जात असताना श्रीनिवास रस्त्याच्या काठावर थांबला. शौचास जात असतानाच भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्याला जोरदार धडक दिली. श्रीनिवास बालाजी आडकिणे (वय १७ वर्षे) रा. हमरापूर ता. अर्धापूर हा विद्यार्थी गंभीर जखमी झाला. या घटनेची माहिती मिळताच माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी उमाकांत सरोदे यांनी १०८ चे डॉ. आनंद शिंदे, चालक संभाजी कल्याणकर, नरेंद्राचार्य महाराज रूग्णवाहिकेचे चालक राजू पाचंगे यांना घटनेची माहिती दिली. जखमीस ग्रामीण रुग्णालय अर्धापूर येथे दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. यावेळी उत्तरीय तपासणी डॉ. युवराज दाढाळे यांनी केली. मयत श्रीनिवास अडकिणे हा विद्यार्थी जिल्हा परिषद हायस्कूल अर्धापूर येथे नव्या वर्गात शिक्षण घेत होता.



**नांदेड** : नांदेड परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, दै. गोदातीर समाचारचे संपादक केशव घोणसे पाटील, पत्रकार गोविंद करवा.

## टीएमसी, सपानंतर ठाकरेंच्या शिवसेनेनेही सोडला काँग्रेसचा हात; दिल्ली निवडणुकीत 'आप'ला जाहीर केला पाठिंबा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकी २०२४ मध्ये महाविकास आघाडीला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. यानंतर महाविकास आघाडीमधील घटक पक्ष काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) यांच्यात सर्वकाही अलबेल नसल्याचं दिसून येत आहे. कारण उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने गुरूवारी ५ फेब्रुवारी होणाऱ्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेसऐवजी अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाला पाठिंबा जाहीर केला आहे.

शिवसेना उद्धव ठाकरे) पक्षाचे खासदार अनिल देसाई यांनी दिल्लीत माध्यमांशी बोलताना यामागचे कारण सांगितले आहे. ते म्हणाले की, अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आपने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत शिवसेना (ठाकरे) पक्षाला पाठिंबा दिला होता, त्यामुळे त्यांचा पक्ष आपला पाठिंबा देईल. आम आदमी पक्ष, शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि काँग्रेस हे विरोधकांच्या इंडिया आघाडीमधील सहकारी पक्ष आहेत. पण दिल्ली विधानसभा निवडणुकीत आप आणि काँग्रेस स्वतंत्रपणे लढच आहेत. २०२४ ची लोकसभा निवडणूक या दोन्ही पक्षांनी एकत्र येत लढली होती.

ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने दिल्ली विधानसभा निवडणुकीत आप पक्षाला पाठिंबा जाहीर केल्याच्या एका दिवसानंतर लगेच शिवसनेना(उद्धव ठाकरे) पक्षाने देखील आपला पाठिंबा जाहीर केला आहे. गेल्या वर्षी डिसेंबर



महिन्यात इंडिया आघाडीतील आणखी एक सहकारी समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी देखील दिल्ली निवडणुकीत त्यांचा पक्ष आपच्या पाठीशी असेल असे जाहीर केले होते.

दरम्यान शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे नेते संजय राऊत यांनी इंडिया आघाडी ही लोकसभेसाठी तयार करण्यात आली होती आणि प्रत्येक निवडणुकीत युती म्हणून त्याचा विचार केला पाहिजे असे म्हटले आहे. राऊत म्हणाले की, आप आणि काँग्रेस हे दोन्ही पक्ष इंडिया आघाडीचा भाग आहेत. आम्ही सातत्याने सांगत आलो आहोत की काँग्रेस देशातील मोठा पक्ष आहे, पण आप हा दिल्लीतील मोठा पक्ष आहे. दिल्लीत आपकडे जास्त ताकद आहे. दिल्लीतील वातवरण असं आहे की आप मोठ्या फरकाने निवडणुका जिंकत आहे. अरविंद केजरीवाल यांच्यासारख्या नेत्याला काँग्रेस देशद्रोही म्हणते याचे आमच्या पक्षाला दुःख आहे.

## स्थानिक गुन्हे शाखेकडून चार पिस्तूल व तीन जिवंत काडतूस जप्त, चार जणांना केली अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहर व जिल्ह्यात हातात घातक पिस्तूलसारखे शस्त्र बाळगून रेकॉर्डवरील चार सराईत गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार मिलिंद सोनकांबळे यांच्या टीमने गुरुवार, दि. ९ जानेवारी रोजी अटक केली. त्यांच्याकडून चार पिस्तूल आणि तीन जिवंत काडतूस जप्त केले आहेत. चारही आरोपींची कसून चौकशीनंतर त्यांना नांदेड ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.



पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी नांदेड शहरात तसेच जिल्ह्यामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अवैध धंद्यावर कार्यवाही करुन तसेच रेकॉर्डवरील आरोपीतांना चेक करुन कायदेशिर कारवाई करण्याबाबत तसेच विनापरवाना बेकायदेशिररित्या अग्नीशस्त्र व शस्त्र ताब्यात बाळगणाऱ्या इसमाविरुद्ध कायदेशिर कारवाई करण्याबाबत अधिनस्त सर्व अधिकारी व अंमलदार यांना आदेश दिलेले होते.

९ रोजी पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे व त्यांचे सहकारी अंमलदार तिरुपती तेलंग, रविशंकर बामणे, मिलिंद नरबाग, अफजल पठाण, चंद्रकांत स्वामी, राहुल लाटकर आणि सिद्धार्थ सोनसळे यांच्या टिमने विनापरवाना बेकायदेशिर रित्या अग्नीशस्त्र व शस्त्र ताब्यात बाळगणाऱ्या इसमाविरुद्ध कायदेशिर कारवाई करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की, आरोपी आलम गबरु शेख (वय २० वर्षे रा. धानोरा ता. लोहा जि. नांदेड) हा अग्नीशस्त्र (पिस्टल) ताब्यात बाळगुन विक्री करीत आहे. त्यावरुन आरोपी विजय प्रकाश बोईनवाड (वय २१ वर्षे रा. सरस्वती नगर जवळ, धार्माबाद), सुरज शेषराव वंजारे (वय २१ वर्षे रा. पिंपळकौठा (मगरे) ता. मुदखेड जि. नांदेड या दोघांना मामा चौक, नांदेड येथून मुद्देमाला-सह ताब्यात घेण्यात आले आहे.

त्याचबरोबर आरोपी आलम गबरु शेख वय २० वर्षे रा. धानोरा ता. लोहा, जि. नांदेड, विजय भास्कर कंधारे (वय २३ वर्षे रा. समगा ता. जि. हिंगोली) यांना लोहा जि. नांदेड येथून ताब्यात घेण्यात आले आहे. या चार आरोपीतांच्या ताब्यातून चार अग्नीशस्त्र (पिस्टल) व तीन जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. त्या सबंधाने पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण, नांदेड व पोलीस स्टेशन लोहा जि. नांदेड येथे गुन्हे दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाईमध्ये सहभागी असलेले अधिकारी व अंमलदार यांना बक्षीस जाहीर करुन चांगल्या कारवाईचे कौतूक केले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली...

भारत हा जगातील सर्वात मोठ्या लोकशाही व्यवस्थेतील एक धर्मनिरपेक्ष देश म्हणून ओळखला जातो. धर्मनिरपेक्षता ही केवळ भारताची घटना नाही, तर एक जीवनशैली आहे, जी सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता आणि परस्पर आदर यावर आधारित आहे. मात्र, अलिकडच्या काळात धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली अधर्म, अन्याय, आणि कट्टरता वाढताना दिसत आहे. या परिस्थितीला जबाबदार कोण? सरकार, समाज, की राजकीय नेतृत्व? हा प्रश्न आजच्या काळात खूप महत्त्वाचा ठरतो. गोस्वामी तुलसीदास यांनी आपल्या रामचरितमानस महाकाव्यात म्हटले आहे, परहित सरिस धर्म नाही भाई, परपीडा सम नाही अधमाई. म्हणजेच दुसऱ्याचे भले करण्याला धर्म मानले जाते, तर दुसऱ्याला पीडा देणे हे अधर्म ठरते. आज भारतात धर्म आणि अधर्म यांच्या सीमारेषा धूसर होत चालल्या आहेत. धर्माचा अर्थ फक्त एका विशिष्ट संप्रदायासाठी न राहता, सर्व मानवजातीच्या भल्यासाठी असावा, असा विचार वेद-पुराणांपासून महात्मा गांधींपर्यंत सर्वांनी केला आहे. परंतु सध्याच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थितीत, धर्माच्या नावाखाली असहिष्णुता, हिंसा आणि विभाजन वाढत आहे. भारताची धर्मनिरपेक्षता ही प्रत्येक व्यक्तीला त्याच्या श्रद्धेनुसार वागण्याचा अधिकार देते. मात्र, काही वेळा हीच धर्मनिरपेक्षता धार्मिक कट्टरता आणि तुष्टीकरणाचे साधन बनते. राजकीय पक्षांकडून विशेषतः या संकल्पनेचा अपलाभ घेतला जातो. उदाहरणार्थ, काही राजकीय नेत्यांकडून विशिष्ट अल्प संख्यांक समुदायाच्या मतांसाठी इतर समुदायांच्या भावनांकडे दुर्लक्ष केले जाते. अशा तुष्टीकरणाच्या राजकारणामुळे समाजातील धार्मिक समतोल बिघडतो आणि अशा राजकीय लोकांबद्दल लोकांच्या मनामध्ये तीव्र द्वेष आणि शत्रुत्वाची भावना निर्माण होते. हिंदू धर्म हा सहिष्णुतेचा, उदारतेचा आणि समरसतेचा धर्म आहे. वसुधैव कुटुंबकम्‍ म्हणजेच संपूर्ण जग एक कुटुंब आहे ही भावना हिंदू धर्माचे मूळ गमक आहे. परंतु, कट्टरतावादी विचारसरणीने या उदार धर्मालाही दूषित करण्याचा प्रयत्न केला आहे. आज विविध धार्मिक ठिकाणांच्या वादातून निर्माण होणारे तणाव, राजकीय स्वार्थासाठी उभे केले जात आहेत. या तणावांमुळे समाजातील शांतता भंग पावत आहे आणि विकासाची गती मंदावते. राजकीय नेत्यांकडे समाजातील तणाव कमी करण्याचे, शांतता आणि समता प्रस्थापित करण्याचे कर्तव्य आहे. परंतु, अनेकदा हेच नेते धार्मिक मुद्द्यांचा उपयोग स्वतःच्या स्वार्थासाठी करताना दिसतात. १९४७ च्या भारताच्या फाळणीनंतरचा इतिहास पाहिला, तर धार्मिक तणाव कमी करण्याऐवजी तो आणखी कसा वाढवला गेला, हे स्पष्ट होते. उदाहरणार्थ, फाळणीनंतर हिंदू आणि मुस्लीम समाजातील दंगली आणि त्यावर प्रशासनाचा अपरिपक्व प्रतिसाद हा कटू सत्य आहे. आज धर्म आणि अधर्म यातील सीमारेषा स्पष्ट करण्यासाठी योग्य शिक्षणाची नितांत गरज आहे. केवळ धार्मिक ग्रंथांचा अभ्यासच नव्हे, तर त्यामागील तत्त्वज्ञान आणि मानवकल्याणाचा विचारही लोकांपर्यंत पोहोचवायला हवा. भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. येथे विविध धर्म, संस्कृती, भाषा आणि चालीरीती एकमेकांशी मिळून मिसळून राहिल्या आहेत. अशा स्थितीत, इतिहासातील काही धार्मिक वादांवरून विद्यमान परिस्थितीत वाद निर्माण करणे अनावश्यक आहे. काही लोकांच्या मतानुसार, अशा वादांमुळे सामाजिक सलोखा बिघडतो आणि विकासात अडथळे येतात. त्यामुळे देशाच्या सर्वांगीण विकासासाठी एकतेचा मार्ग अवलंबणे गरजेचे आहे. राजकारणातील लोकांनी अशी प्रथा सुरू केली आहे. म्हणूनच आता गरज आहे ती लोकांनी जागृत होण्याची. सरकारने धर्मनिरपेक्षतेची व्याख्या केवळ राजकीय स्वार्थासाठी न वापरता, ती सर्व समाजासाठी उपयुक्त ठरेल, अशा पद्धतीने मांडायला हवी. भारतात एक देश, एक निवडणूक किंवा एक देश, एक कर यांसारख्या धोरणांवर चर्चा सुरू आहे. त्याच धर्तीवर, एक देश, एक धर्मनिरपेक्ष तत्त्व राबविणे शक्य आहे. याचा अर्थ असा नाही की कोणाच्याही धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आणली जाईल; उलटपक्षी, सर्व धर्मांना समान वागणूक दिली जाईल. धर्मनिरपेक्षतेचा अर्थ धर्माच्या विरोधात जाणे नव्हे, तर सर्व धर्मांचा आदर राखून मानवतेला प्राधान्य देणे हा आहे. धार्मिक कट्टरता, अधर्म, आणि अन्याय थांबवण्यासाठी सरकार, समाज, आणि धार्मिक नेते यांना सामूहिक जबाबदारीने काम करावे लागेल. सत्य, अहिंसा, आणि सेवा या तत्त्वांवर आधारित शिक्षण, आणि समान न्यायाचा आग्रह यामुळेच धर्म आणि अधर्म यातील सीमारेषा स्पष्ट होऊ शकेल.

# माणूस : कोण होतास तू काय झालास तू!



नवीन वर्षाचे प्रारंभिक उत्सव, संकल्प, आणि नव्या सुरुवातीचा उत्साह आता ओसरला आहे. दिवसांमागून दिवस जात आहेत, आणि आपले जीवन पुन्हा नेहमीच्या चक्रात अडकले आहे. हे चक्र अपरिहार्यच आहे. माणसाने रानटी अवस्थेपासून सभ्यतेच्या टप्प्यावर येईपर्यंत प्रचंड प्रवास केला आहे. अश्मयुगापासून ते संगणक क्रांतीपर्यंत, निसर्गाशी जुळवून घेत शेतीपासून तंत्रज्ञानापर्यंतची उडी घेत मानवाने प्रगती साधली. पण या प्रगत प्रवासाचा विचार करताना एक प्रश्न कायम आपल्या मनाला टोचतो. आपण खरोखरच शहाणे झालो आहोत का?

**प्रगतीची पराकाष्ठा, पण विवेकाचा अभाव**

मानवजातीने अवजारे निर्माण केली, धर्म आणि राज्यव्यवस्था उभारली, आणि विज्ञान व तंत्रज्ञानाच्या जोरावर चमत्कार घडवले. आपण चंद्रावर पोहोचलो, कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास केला, परग्रहांवर जीवन शोधत आहोत. पण या सगळ्याने आपण विवेकशील झालो का? शहाणपण म्हणजे केवळ शिक्षण किंवा संशोधन नव्हे, तर विवेक आणि समतोल बुद्धीचा वापर होय. फळं कापण्यासाठी तयार केलेली सुरी खून करण्यासाठी वापरण्याची बुद्धी सुशिक्षित असली तरी शहाणपणाची नक्कीच नाही.

**आधुनिकतेत दडलेला अंधार**

आजच्या काळातील जातीयतेचे विष, धार्मिक कट्टरता, आणि राजकीय द्वेष पाहिला, की आपण खरा-खरच शहाणे झालो आहोत का, हा प्रश्न भेडसावतो. धर्माच्या नावावर होणारे हिंसाचार, जातीपातींच्या भिंती, आणि द्वेषाचा वाढता पगडा ही मानवी प्रगतीची शोकांतिका ठरली आहे. तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे असलेल्या जगात निष्पाप जीवांचा बळी जात आहे. अनाथ मुले, विधवा स्त्रिया, आणि असहाय्य वृद्ध यांचे आयुष्य यात भरडले जात आहे. आपण सुसंस्कृत समाज म्हणून स्वतःचा गौरव करतो, पण ही क्रूरता कशाची साक्ष देते?

**नातेसंबंधांतील दुरावा**

एकेकाळी कौटुंबिक नातेसंबंधांचा गोडवा असलेल्या समाजात आज द्वेष, असूया आणि अविश्वासाचे विष पसरले आहे. रक्ताच्या नात्यांमध्येही फाटाफुट झाली आहे. आई-वडील, भाऊ-बहिण, पती-पत्नी यांच्या नात्यांमध्ये आता संवादाऐवजी संशय दिसतो. निसर्गाशी जुळवून घेतलेले जीवन आता यांत्रिक बनले आहे. आपली जीवनशैली परिपूर्ण आहे का, याचा विचारच केला जात नाही.

**राजकीय अधःपतन आणि समाजमाध्यमांचे दुष्परिणाम**

आजचे राजकारण म्हणजे चिखलफेक, शिवी-गाळ, आणि सत्तेची लालसा यांचा खेळ झाला आहे. स्वार्थी पुढारी लोकशाहीच्या मूल्यांना पायदळी तुडवत आहेत. त्यात समाजमाध्यमांचा अतिरेकी वापर भर घालतो आहे. माहितीचे मायाजाल, ज्याने लोकांना जोडायला हवे होते, ते समाजात फुट पाडत आहे. समाजमाध्यमांचा चुकीचा वापर, कृत्रिम बुद्धिमत्तेचा अतिरेक, आणि निसर्गाचे संतुलन बिघडवणाऱ्या औद्योगिक क्रांतीत माणूस हरवला आहे.

**निसर्गाचा संतुलन बिघडवणारा शहाणा माणूस**

औद्योगिक विकासाच्या नावाखाली निसर्गाची नासाडी होत आहे. जंगलतोड, पाण्याचे दूषित होणे, आणि प्राण्यांच्या अधिवासावर आक्रमण हा विकासाचा क्रूर चेहरा आहे. काँक्रिटच्या जंगलांनी हिरवे रान गिळंकृत केले आहे. आपला प्रत्येक निर्णय निसर्गाच्या विनाशाला जबाबदार आहे. आपण निसर्गाचे पुत्र असूनही त्याच्या विनाशाला कारणीभूत ठरत आहोत.

**शहाणपणाचा खरा अर्थ**

शहाणपण म्हणजे शिक्षण, संपत्ती, किंवा विकास नव्हे. शहाणपणाचा अर्थ आहे विवेकशीलता, समतोल विचार, आणि निसर्गाशी सुसंवाद. आपण भौतिक प्रगती केली, पण मानवी मूल्यांच्या बाबतीत मागे पडलो. तंत्रज्ञानाचा योग्य वापर, निसर्गाचा सन्मान, आणि माणुसकीच्या मूलभूत तत्त्वांचे पालन यातच खरी प्रगती आहे.

**बदलाची गरज**

आज माणसाने स्वतःचे आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. तिसऱ्या महायुद्धाच्या सावटाखाली असलेल्या या जगात आपल्याला स्वार्थ, द्वेष, आणि हिंसाचाराचा त्याग करून प्रेम, शांतता, आणि सौहार्दाचा मार्ग स्वीकारावा लागेल. निसर्गाशी समरस होण्याचा प्रयत्न करावा लागेल. विकासाचे तत्त्वज्ञान निसर्गसंवर्धनाशी बांधील असावे. तंत्रज्ञानाचा वापर माणसाला जोडण्यासाठी व्हावा, विभाजनासाठी नव्हे. समाजमाध्यमांचा उपयोग संवादासाठी व्हायला हवा, फुट पाडण्यासाठी नव्हे. मानवाने जेव्हा विवेकशीलता स्वीकारली, तेव्हाच खरा शहाणपणा प्रकट होईल. स्वतःसाठी जगण्याऐवजी इतरांसाठी जगणे शिकायला हवे. समाजात समतेची भावना रुजवून जातीयतेचा नाश करायला हवा. कौटुंबिक नात्यांतील प्रेम पुन्हा जागृत करायला हवे. माणसाने निसर्गाच्या चिरंतन नियमांशी जुळवून घेतले, तरच पर्यावरणाचा समतोल टिकेल आणि मानवी जीवनही सुसह्य बनेल.

**शेवटी हेच म्हणायचं...**

प्रगतीचा हा प्रवास जितका गौरवशाली आहे, तितकाच विचार करायला लावणारा आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, आणि विकास यांचा उपयोग केवळ भौतिक सुखासाठी न होता, मानवतेच्या कल्याणासाठी व्हायला हवा. आपण सुसंस्कृत होण्यासाठी केवळ शिक्षण पुरेसे नाही; शहाणपण आणि विवेक आवश्यक आहे. नवीन वर्षाचे नावीन्य जसे ओसरते आहे, तसेच या नव्या वर्षात आपण या विचारांनी प्रेरित होऊन खरे शहाणपण आत्मसात करू या, हा संकल्प करू या. मानवी जीवनात शहाणपणाची चाहूल लागली, तरच खऱ्या अर्थाने नवीन वर्षाला नवीन दिशा मिळेल.

**-प्रा. सु. ग. जाधव**
नांदेड
मो. ९४२३१४०७४१

# सत्याची संगत लाभली की, प्रगतीचा मार्ग मोकळा

एके दिवशी रस्त्यावर एक माणूस मला अस्वस्थपणे काहीतरी शोधत असल्याचे दिसले. मी त्याला विचारल्यावर त्याने मला सांगितले की, तो परिसाच्या शोधात असून, त्याच्याकडील लोखंडाचे त्याला सुवर्ण करायचे आहे. इथे मला प्रश्न पडला की,परीस खरंच असा रस्त्यावर सापडेल का? परीसासारखी अमूल्य गोष्ट इतकी स्वस्त आहे का? आपण नेहमी ऐकत असतो की,

परीसाचीय संगे,
लोहाचे होई सुवर्ण

याचा अर्थ परीसाच्या सानिध्यात आल्यावर, लोखंडाचे सोने होते. मग नेमकी हीच बाब लक्षात घेतली तर, आपण तर मनुष्य आहोत व आपणही जीवनात अनेकांच्या सानिध्यात येत असतो. मग आपल्या जीवनास सुवर्ण बनवण्यासाठी आपण कुणाच्या संगतीत राहतो किंवा आपला परीस कोण आहे, यावर आपल्या जीवनाची वाटचाल सुखी किंवा दुःखी होऊ शकते. किंबहुना आपले आयुष्य सुवर्ण बनू शकते. आपल्यावर संगतीचा परिणाम मोठ्या प्रमाणात होतो. चंदनाच्या सुवासाने जसा भवताल दरवळून जातो, अगदी तसेच चांगल्या व्यक्तीच्या संगतीने माणसाचे जीवन दरवळून जाते. दुधात साखर मिसळल्यावर जसे ते गोड लागते, तसेच जीवनरूपी दुधात, सकारात्मक विचार रुपी संगतीची साखर मिसळल्यावर जीवनरूपी चहा गोड होतो. मनुष्याच्या हातात आहे, की त्याने चांगल्याची का वाईटाची संगत घ्यावी. भोगी माणसाच्या संगतीमध्ये माणूस भोगी व योग्याच्या संगतीत माणूस योगी बनतो.

अग्नीच्या जवळ गेल्यावर शरीराला त्रास होतो, पण फुलांच्या जवळ गेल्यावर शरीरसुद्धा सुगंध देते. आदर्श महापुरुष घडण्यामागचे एक कारण म्हणजे त्यांना सत् किंवा सत्याची संगत लाभली. सत्याची संगत लाभली की, असत्याची बेडी गळून पडते व



मनोवृत्तीत बदल होऊन स्वच्या वैचारिक प्रगतीचा मार्ग मोकळा होतो. असे म्हणतात की,

ढवळ्या शेजारी,
पवळ्या बांधला,
वान नाही पण,
गुण लागला

याप्रमाणे नक्कीच, कुणाच्याही संगतीत राहा, त्याचा गुण आपणास लागणारच. चांगल्याच संगतीत राहिलो तर आयुष्याचे गणित सहज सोडवता येईल, पण वाईट व्यक्तीच्या संगतीमध्ये, वाईट सोबतीमध्ये, एकदा जीवनाची बेडी आडकली की मग सुटका नाही. संगतीचा परिणाम हा झाल्याशिवाय राहत नाही. एकाच माणसाचे दोन पोपट त्याने एक साधूच्या संगतीमध्ये व दुसऱ्यास वाईट वृत्ती असलेल्या माणसाच्या संगतीमध्ये ठेवल्यावर, जेव्हा काही दिवसांनी तो माणूस दोन्ही घरी जातो, तेव्हा साधूच्या संगतीमधील पोपट साधूचे नम्रपणे स्वागत करतो तर दुसरा पोपट साधूला शिव्या घालतो. यावरून संगतीचा लाभ लक्षात येतो.

इंग्रजीत म्हटल्याप्रमाणे,

Mind has its own place, can make a heaven of hell or a hell of heaven.

याचा अर्थ असा की, केवळ आपल्या मनावर किंवा आपल्या 'स्व'वर हे अवलंबून आहे की, आपल्या जीवनाचा स्वर्ग करायचे का नर्क व यास चांगल्या व वाईट संगतीचा परिणाम प्रभाव टाकतो. इतिहास आपणास अनेक दाखले देत आणखी आपले भविष्य सुधारण्यासाठी उभा आहे. अर्जुन, कृष्णाचा सखा, सोबती होता व त्याच्या सानिध्यात अर्जुनाच्या जीवनाचे सुवर्ण झाले. संतांच्या सानिध्यात आल्यावर प्रत्येकाच्या वाट्याला सुखी जीवन लाभले. याउलट दानव वृत्ती असलेल्यांचे सानिध्य आपणास वाईट वळणावर नेऊन ठेवते. रामाच्या सानिध्यात राहिल्यावर किंवा त्याच्या तत्त्वाचे पालन केल्यावर बिभीषण आपले जीवन सुवर्ण बनवू शकला, तर दुसऱ्या बाजूला कुंभकर्ण रावणाच्या कूट वृत्तीच्या सानिध्यात राहून त्याला आपला बळी द्यावा लागला. मंथरासारख्या कपटी दासीच्या संगतीमध्ये येऊन कैकयीने स्वतःच्या जीवनाचे नुकसान करून घेतले हे आपणास ज्ञात असून, महाभारत व रामायण यामधून चांगल्या संगतीमध्ये आल्यावर जीवनाचे सुवर्ण व वाईट व्यक्तीच्या संगतीमध्ये आल्यावर याच जीवनाचा कोळसा झाल्याचे अनेक उदाहरणं देता येतील. आयुष्य नावाच्या रांगोळीत, संत विचाररूपी रंग किंवा चांगल्या विचाराचे रंग भरले, तर ही रांगोळी अधिकच आकर्षक होईल.

फुलांच्या सानिध्यात राहून मातीला सुगंध येतो, तसाच सद्गुणी माणसाच्या सानिध्यात राहिल्यावर, आपल्या जीवनाची दिशा सकारात्मक होऊन आपले जीवन सुखी, आनंदी, चांगले होण्याची शक्यता वाढत जाते. आजच्या काळाचा विचार केला तर लक्षात येते की, आपल्या तरुण पिढीवर चांगल्या संस्कार करणाऱ्या माणसांची गरज असून, वाढते आधुनिक जीवन व त्यांना कुणाच्या संगतीत रहावे हे उमगत नसल्याचे लक्षात येते. बेभान वारा वाहत असल्यासारखा आजचा तरुण योग्य संगतिविना वाईट मार्गावर वाहत जाऊन त्याचा शेवट फार भयाण होतो हे आज आधुनिक जगात सर्वत्र दिसते आहे. शबरीचे बोर खाणाऱ्या रामाच्या सानिध्यात आल्यावर तिचा सुद्धा उद्धार होतो हे सर्व ज्ञात आहे.

विद्यार्थ्याला ग्रंथरूपी परिसाच्या सानिध्यात येऊन, जीवनाचे सुवर्ण करता येते. महात्मा फुले यांना थॉमस पेनचे पुस्तक परिसासारखे वाटले, तर आंबेडकरांना गौतम बुद्धांचे चरित्र. उत्कृष्ट ग्रंथ, मित्र, पुस्तके, शेजारी, गुरु, शिक्षक व आदर्श जीवनाच्या गाथा, आपल्यासाठी परीसच असून, आपण या परिसाचा लाभ घेऊन आपले जीवन सुवर्ण बनवू शकतो.

याबरोबरच आपण कितीही वाईट व्यक्तीच्या संगतीला लागलो तरी आपण त्याच्या प्रभावाखाली न येण्याचे कसब दाखवू शकतो, त्यास मनाच्या भक्कम सकारात्मक रुपाची गरज असते. जीभ सर्व अन्नग्रहण करते, पण पोटाचा आकार वाढतो, जीभेचा आकार वाढत नाही, त्याप्रमाणेच बऱ्याचदा वाईट व्यक्ती आपल्या जीवन मार्गात आपल्या सोबत राहतात, परंतु तरीदेखील आपण आपल्यावर प्रभाव न होऊ देता त्या जीभेप्रमाणे अलिप्त राहिले, तर नक्कीच आपल्यावर त्याचा प्रभाव होणार नाही. समाजाची आजची अवस्था पाहिली, तर सगळीकडे चांगल्या संगतीचा, खऱ्या मार्गदर्शकाचा अभाव असलेला दिसून येतो. आजच्या या आधुनिक जगात चांगली संगत मिळणे, ती ओळखणे ही तारेवरची कसरत असून, ही कसरत करताना आपली कसोटी लागते. पण ज्याने ही कसोटी यशस्वीपणे पार केली, त्याचे आयुष्य नक्कीच सुवर्ण होते.

शेवटी हिंदीत म्हटल्याप्रमाणे,

संग जया जैसा,
लाभ तया तैसा

म्हणून आयुष्यात चांगल्याच्या संगतीने लाभ व वाईट वृत्तीच्या माणसाच्या संगतीने नुकसान झाल्याचे अनेक मूर्तिमंत उदाहरण दिसून येतात. श्रीकृष्णासारखा सारथी किंवा सखा, मित्र, जर आपल्याला आयुष्याच्या रथावर सारथी म्हणून भेटला, तर या आयुष्यरुपी कुरुक्षेत्रावर आपला विजय नक्कीच होईल. जीवनात चांगल्याचा, सत्याचा, संत विचारांचा, संग घडला तर नक्कीच आयुष्याचा सत्संग होईल...

संग अच्छे का,
साथ सच्चे का,
रंग लायेगा, जिंदगी
मे खुशियो का.

**-प्रा. अमित शिंदे**
मु. पो. रोहिपिंपळगाव
ता. मुदखेड, जि. नांदेड.
मो. ९७६७८५१०४६

# स्त्री हे विश्वनिर्मितीचे केंद्र

नजूबाई गावित या आदिवासी, भूमिहीन, शेतकरी, धरणग्रस्त इत्यादींच्या लढ्यात सहभाग घेणाऱ्या आदिवासी समाजातील कार्यकर्त्या आहेत. श्रमिक महिला संघ स्थापन केला. आदिवासी महिलांचे आर्थिक जीवन व आरोग्य सुधारण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केले. सत्यशोधक मार्क्सवादी चळवळीत आदिवासी स्त्रियांचं नेतृत्व करण्याचे कार्य नजूबाई गावितांनी केले. निसर्गाशी एकरूपता, प्राणिप्रेम, समूहनिष्ठा, सहकार्याची भावना, धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, समता, बंधुता, अल्पसंतुष्ट वृत्ती, माणुसकी ही मानवी मूल्ये आदिवासी जीवनात पाहण्यास मिळतात. ती मूल्ये नजूबाईंच्या साहित्यात अपरिहार्यपणे येतात. ज्ञानवर्धक व रोचक अशी संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर लेखात जरूर वाचा.... संपादक.

नजूबाई गावित यांचे नाव भारतीय साहित्यविश्वात सशक्त आणि प्रतिभासंपन्न साहित्यिक म्हणून घ्यावे लागेल. त्यांनी त्यांच्या साहित्यातून आदिवासींचे सर्वंकष भावविश्व साकारले. त्या वंचित, शोषित, उपेक्षित, पीडित, कष्टकरी महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी धडाडीच्या कार्यकर्त्या म्हणून विविध चळवळींमध्ये अग्रेसर राहिल्या आहेत. लढवय्या कार्यकर्त्या म्हणून त्यांच्याकडे आदराने आणि अभिमानाने बघितले जाते. नजूबाईंचा जन्म दि.१० जानेवारी १९५० रोजी बोद्रीपाडा, तालुका साक्री, जिल्हा धुळे येथे भूमिहीन मावची आदिवासी कुटुंबात झाला. दळणवळणाची साधने, रस्ते, वीज, शिक्षण अशा भौतिक सुविधा तेथे नाहीत. दुर्गम प्रदेश आणि परिस्थिती दारिद्र्यमय व कष्टमय, अशा प्रतिकूल परिस्थितीत त्यांना फक्त चौथीपर्यंत शिक्षण घेता आले. लग्नानंतरही त्यांचा दारिद्र्यमय परिस्थितीशी संघर्ष काही सुटला नाही. उलट त्यांच्यावर पतीमुळे त्यांच्याकडे लक्ष पुरवण्याची जबाबदारी आली. नजूबाई कॉ.शरद पाटील यांच्या संपर्कात आल्यानंतर मात्र त्यांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडले. नजूबाईंचा स्वभाव मूलतः अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याचा असल्याने शरद पाटील यांच्या साथीने त्यांना नवीन ऊर्जा मिळाली. त्या लढवय्या कार्यकर्त्यांच्या भूमिकेतून परिवर्तनवादी चळवळीमध्ये उपेक्षित, वंचित घटकांच्या न्यायासाठी पाय रोवून उभ्या राहिल्या. नजूबाईंनी स्वीकारलेले समाज-परिवर्तनाचे कार्य सातत्याने चालू आहे. त्यांनी सन १९७४ साली धुळे जिल्हा श्रमिक महिला संघाची स्थापना केली व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. त्यांनी सन १९७८ साली जातीच्या प्रश्नावर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा राजीनामा देऊन सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष व सत्यशोधक कष्टकरी महिला सभा यांची स्थापना केली. त्यांनी साक्रीला दलित-आदिवासी-ग्रामीण संयुक्त साहित्य महासभा सन १९८६ साली स्थापन केली. त्यांनी तशा प्रकारची साहित्य संमेलने होण्यासाठी पुढाकार घेतला. त्या उपेक्षित, वंचित, पीडित घटकांच्या संदर्भात अनेक लढ्यांत अग्रेसर राहिल्या व त्यासाठी त्यांना काही वेळा कारावासही भोगावा लागला आहे. देशात आणीबाणी सन १९७५मध्ये जाहीर झाली, तेव्हा त्या स्थानबद्ध झाल्या. त्या सन १९७८पासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यात पुढाकार घेऊन शेकडो महिलांसह सहभागी झाल्या. त्यांनी सटाण्याला सन १९९८ साली भरलेल्या पाचव्या दलित-आदिवासी-ग्रामीण संयुक्त साहित्य संमेलनात अब्राह्मणी साहित्य व कला महासभा स्थापनेची घोषणा केली. नजूबाईंचे चळवळीतील हे कार्य विस्मयकारक असेच आहे.

लढवय्या कार्यकर्ती असा नजूबाईंचा पिंड असल्यामुळे त्या राजकीय पक्ष, प्रसिद्धी आणि पदे यांपासून लांबच राहिल्या. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने तेरावे विद्रोही साहित्य आणि संस्कृती संमेलन दि.२३-२४ डिसेंबर २०१७ला नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथे आयोजित केले गेले. त्या संमेलनाच्या अध्यक्षपदी नजूबाईंची निवड करण्यात आली. त्या म्हणाल्या, मी अध्यक्षपद आदिवासी समाजाला मान्यता मिळावी, न्याय मिळावा यासाठी स्वीकारले. आदिवासींमध्ये तुरळक साहित्यिक आहेत. आता अनेक आदिवासी साहित्यिकांनी साहित्यलेखनात उतरले पाहिजे. मोठ्या प्रमाणात ती चळवळ पुढे गेली पाहिजे. समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी चळवळीची आवश्यकता आहे. नजूबाईंची आदिवासी साहित्य आणि आदिवासी साहित्य संमेलने यांविषयीची भूमिका अशी, की आदिवासींचे समग्र जीवन ज्यातून वास्तव स्वरूपात पुढे येईल ते आदिवासी साहित्य. आदिवासी लेखक तुटकपणाने लिहितो. बोलीभाषेसहित आदिवासी जीवन चितारणे गरजेचे आहे. आदिवासी साहित्य कोणत्या साहित्याला म्हणावे हे ठरवताना आदिवासींवरील साहित्याची पडताळणी पूर्णपणे करणे गरजेचे आहे. मराठी साहित्यांतर्गत आदिवासी साहित्याचा विचार करणे योग्य नाही, अशी त्यांची स्पष्ट भूमिका आहे. त्यांच्या मते, मराठी साहित्य म्हणजे ब्राह्मणी साहित्य होय. आदिवासींचे प्रश्न मराठी साहित्यात विचारात घेतले जाणार नाहीत, त्यांचे ब्राह्मणीकरण केले जाईल, अशी परखड भूमिका त्या मांडतात. नजूबाईंनी सत्यशोधक मार्क्सवादी मासिकातून सुरुवातीला लेखन केले. त्यांच्या काही कथाही तेथे प्रकाशित झाल्या. नजूबाईंच्या नावावर सन १९९५मध्ये प्रकाशित झालेले आदोर हे आत्मकथन व तृष्णा, सन २००८मध्ये प्रकाशित झालेली भिवा फरारी कादंबरी आणि नवसा भिलणीचा एल्गार हा २०१३ मध्ये प्रकाशित झालेला कथासंग्रह अशी साहित्यसंपदा आहे. त्यांच्या साहित्यात प्रत्यक्ष जीवनानुभूती आणि कार्यकर्त्याची दृष्टी यांचा संगम झालेला दिसतो. त्यामुळे त्यांच्या साहित्याला खोली प्राप्त



झालेली आहे. आदिवासी जीवनातील समृद्ध लोकपरंपरेचा, लोकसाहित्याचा बाज त्यांच्या साहित्याला आहे.

नजूबाई आदिवासी समाजात स्त्रियांना असणारे महत्त्व, मातृसत्ताक पद्धत याकडे लक्ष वेधतात. त्या स्वतः मातृसत्ताक व्यवस्थेच्या वारसदार असल्याचा अभिमान त्यांच्या लेखनात ठायी ठायी जाणवतो. नागर, ग्रामीण जीवनामध्ये स्त्रियांचे असणारे दुय्यम स्थान, स्त्रियांची घुसमट आदिम जीवनामध्ये नाही. स्त्री हे विश्वनिर्मितीचे केंद्र असून सर्जन करण्याची अलौकिक शक्ती तिच्यात असते. आदिवासींमध्ये पुरुषांइतकेच स्त्रीला महत्त्व आहे, किंबहुना ती काही बाबतींत पुरुषांहूनही श्रेष्ठ आहे, असा विश्वास आजही आदिवासी समाजात आहे. गारो, खासी, जयंतिया या आदिवासी जमातीत आजही मातृसत्ताक कुटुंबव्यवस्था दिसते. आदिवासींमध्ये स्त्रियांना त्यांचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. लग्नात मुलीला देज- वधुशुल्क दिले जाते. तेथे बालविवाह, स्त्रीभ्रूणहत्या नाही. पुनर्विवाहाला मान्यता आहे. विधवाविवाह संमत आहे. जमातपंचायतीत सहजपणे होणारा काडीमोड या गोष्टी आदिवासी जीवनात आहेत. त्या बाबी नजूबाई यांच्या साहित्यातून ठळकपणे अधोरेखित होतात. होळीच्या वेळी केल्या जाणाऱ्या दिंडण नृत्यात, डोंगरीदेवाची पूजा करताना पुरुष स्त्रीवेष धारण करतात. स्त्री आणि भूमी यांच्यातील सर्जनशीलतेचे साधर्म्य लक्षात घेता, धरतीची पूजा अशा वेगवेगळ्या रूपांत होताना दिसते. बहुप्रसवा, बहुविविधा अशी धरित्री अनेक जीवांना जगवत असते, तिच्या चमत्कारांनी दीपून जाऊन आणि तिचा गौरव करण्यासाठी पुरुषांनी तिच्याच प्रतीकात्मक स्त्रीरूपात काही पथ्ये पाळून नाचायचे हा त्यामागील उद्देश असतो. भिवा फरारी या कादंबरीत ते संदर्भ आलेले आहेत. त्या कादंबरीची अर्पणपत्रिका समाजबांधणीत स्त्री राज्याचा मॉडेल म्हणून उपयोग होणार असल्याने, तिच्या वैराज्याला अर्पण केली आहे. एका आदिवासी महिलेने लिहिलेले आदोर हे आत्मचरित्र भारतीय वाययात पहिले ठरते. डॉटर्स ऑफ महाराष्ट्रा- महाराष्ट्राच्या लेकीबाळी या ग्रंथात विद्या बाळ यांनी नजूबाईंचा उल्लेख जगातील पहिली आदिवासी लेखिका म्हणून केला आहे. त्यांनी तृष्णाला आत्मनिवेदनपर कादंबरी म्हटले, तृष्णा हे नजूबाईंचे आत्मचरित्रच आहे. आदोर, रोप, रोपणी, पोराळी असे चार भाग त्यात आहेत. आदोर म्हणजे सुरुवातीची रोपवाटिका तयार करण्याची प्रक्रिया. नंतर रोप तयार करणे, रोपाची लागवड करणे आणि त्यातून निर्माण होणारी उत्पत्ती म्हणजे निर्मिती. मानवी जीवनाची प्रक्रियाही त्या चार टप्प्यांतून जाताना दिसते. नजूबाईंनी त्यांचे त्या चार टप्प्यांतील अनुभव मांडले आहेत. तृष्णाची अर्पणपत्रिका आई- इसरीला केली आहे. इसरी आणि तिचे कुटुंब दारिद्र्यमय परिस्थितीशी संघर्ष करीत गुजराण करताना दिसते. आत्मचरित्रातील ते सूत्र शिरीच्या फुलाची लोककथा यातून नजूबाईंनी सांगितली आहे. नजूबाईंची भिवा फरारी ही ऐतिहासिक कादंबरी म्हणजे आदिवासींच्या उपेक्षित इतिहासातील सुवर्णपान होय. ज्या ज्या वेळी परकीय राजवटी येथे आल्या, त्या त्या वेळी त्यांच्याविरुद्ध सर्वात आधी आवाज उठवला तो आदिवासींनी. आदिवासी जमातींनी केलेले ते संघर्ष भारतीय इतिहासात उपेक्षित राहिले आहेत. ब्रिटिशांच्या जुलमी, जाचक, शोषक व्यवस्थेविरुद्ध भिवाच्या तीन पिढ्यांनी त्यांचे स्वातंत्र्य, स्वाभिमान, अस्तित्व, अस्मिता शाबूत ठेवण्यासाठी दिलेली झुंज हे त्या कादंबरीचे मुख्य सूत्र आहे. नवसा भिलणीचा एल्गार हा सात कथांचा संग्रह. आदिवासींना जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष हा त्या कथांचा विषय आहे. त्यातील नवसा भिलणीचा एल्गार साऱ्या कष्टकरी महिलांना स्त्रीसत्तेचा एल्गार करण्याचे सामर्थ्य देऊन जातो. स्त्री-व्यक्तिरेखांची प्रभावी मांडणी नजूबाईंच्या समग्र साहित्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. मग तृष्णामधील इसरी, सुनता, मांगू, जांबू असो, की भिवा फरारीतील काळघी, तुळसा, सीता असो, की नवसा भिलणीचा एल्गारमधील जानकी, तानकूबाई, सखू, नवसा असोत.

निसर्गाशी एकरूपता, प्राणिप्रेम, समूहनिष्ठा, सहकार्याची भावना, धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, समता, बंधुता, अल्पसंतुष्ट वृत्ती, माणुसकी ही मानवी मूल्ये आदिवासी जीवनात पाहण्यास मिळतात. ती मूल्ये नजूबाईंच्या साहित्यात अपरिहार्यपणे येतात. त्याचबरोबर आदिवासींमधील चालीरीती, रुढी, परंपरा, दैवते, सणोत्सव, जन्म प्रथा, विवाहप्रथा, मर्तिकप्रथा, आदिवासींमधील अज्ञान, दारिद्र्य, संघर्षमय जीवन, स्त्रियांचे लैंगिक शोषण, कुपोषण, धर्मांतर, शासकीय योजनांचा भ्रष्टाचार, भारतीय इतिहासात आदिवासींची झालेली उपेक्षा, अनेक प्रकल्पांमुळे आदिवासींचे होणारे विस्थापन असे आदिवासी जीवनातील अनेक घटक व समस्या यांचे चित्रण त्यांच्या साहित्यात येते, ते ओघवत्या शैलीत, प्रांजळपणे आणि मावची बोलीत. त्यांचे साहित्य वाचकांच्या हृदयाला जाऊन भिडते, चिंतनशील बनवते आणि विचारप्रवृत्त करते. नजूबाई गावित वाढदिनानिमित्त त्यांना निरामय जीवनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**-कृष्णकुमार निकोडे**
गडचिरोली.
मो. ७१३२७९६६८३.

## थोडक्यात...

### कंधार राष्ट्रवादी महिला शहराध्यक्षपदी आम्रपाली केकाटे

**कंधार (प्रतिनिधी)–** येथील सामाजिक कार्यक्रत्या सौ.आम्रपाली राजकुमार केकाटे यांची आमदार



प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला कंधार शहराध्यक्ष पदी निवड केली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे अध्यक्ष अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर, आ.विक्रम काळे यांच्या आदेशानुसार आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी नांदेड येथील बैठकीत आम्रपाली केकाटे यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला कंधार शहराध्यक्ष पदी निवड केली. आंम्रपाली केकाटे यांनी महिला संघटन करत कोरोनाच्या लॉकडाऊन काळात मोलाची भूमिका बजावली आहे.

### भारतीय बौद्ध महासभेच्या भोकर तालुकाध्यक्षपदी सुरेश जोंधळे

**भोकर (प्रतिनिधी)–** येथील सेवानिवृत्त शिक्षक सुरेश जोंधळे यांची दि. ६ जानेवारी रोजी भारतीय बौद्ध महासभेच्या भोकर



तालुकाध्यक्षपदी तर उत्तम एडके यांची सरचिटणीसपदी एकमताने निवड करण्यात आली. शहरातील प्रफुल्लनगर येथील पंचशिल बुद्धविहारात झालेल्या बैठकीत नुतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. त्यात संस्कार उपाध्यक्ष मधूकर तारू, प्रचार व पर्यटन उपाध्यक्ष डी. जे. सोनकांबळे, कोषाध्यक्षपदी ग्यानू चव्हाण, संस्कार सचिव किशोर सोनूले, बाबुराव तोडे, सचिव पर्यटन व प्रचार एम. एम. धोत्रे, चंद्रकांत धमसे, संघटक सी. एम. कदम, उमाकांत एडके, साहेबराव मोरे, साहेबराव लोखंडे, राजु दांडगे, गोविंद गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे.

# ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी मनावर घेतल्यास गावाचा कायापालट शक्य

## सीईओ करनवाल यांचा नुतन ग्रामपंचायत अधिकाऱ्यांशी संवाद

**नांदेड (प्रतिनिधी) –** ग्राम पंचायत अधिकाऱ्यांच्या दैनंदिन जिवनात ग्रामस्थांशी संबंध येतो. गावाच्या समस्यांची त्यांनाच चांगली जाण असते. त्यामुळे ग्रामपंचायत अधिकारी सक्षम आणि कार्यतत्पर असतील तर गावाचा कायापालट शक्य आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मीनल करनवाल यांनी केले.



जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात नव्याने रुजू झालेल्या ग्राम पंचायत अधिकाऱ्यांसाठी दि. ८ जानेवारी रोजी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे व ग्रामपंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा जाधव-कापसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

करनवाल म्हणाल्या की, गावस्तरावर शुद्ध पिण्याचे पाणी, शाश्वत स्वच्छता तसेच शाळा व अंगणवाडीतील पायाभूत सुविधा उभारण्यावर भर देण्याची गरज आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत उपलब्ध २६३ प्रकारच्या कामांचा उपयोग करून गावाचा विकास साधावा असेही त्या म्हणाल्या. कायदा व सुव्यवस्थेचे पालन करत ग्राम पंचायत अधिकाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात. लोकसहभागातून जिल्हयातील नागापूर, हाडोळी, नारवट, जवळगाव, येरगी, शिराढोण आदी गावांनी विकास साधला आहे. नव्याने रुजू झालेल्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी नवी ऊर्जा व उत्साहाने काम करत गावाच्या विकासासाठी आपली भूमिका बजावावी, अशी अपेक्षाही सीईओ मीनल करनवाल यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा कापसे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. मिलिंद व्यवहारे यांनी सूत्रसंचालन केले तर मधुकर मोरे यांनी उपस्थितांचे आभार केले.

## 'नांएसो'चा क्रीडा महोत्सव उत्साहात संपन्न

# कर्मचाऱ्यांना तणावातून मुक्त करण्याचा संस्थेचा प्रयत्न स्तूत्य

### आ. बालाजी कल्याणकर यांचे प्रतिपादन

**नांदेड (प्रतिनिधी)–** क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामाच्या तणावातून मुक्त करण्याचा प्रयत्न स्तूत्य आहे. असे उपक्रम राज्यात सर्वत्र राबविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन आमदार बालाजी कल्याणकर यांनी केले.

नांदेड एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांच्या संकल्पनेतून चार वर्षापासून कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा महोत्सव घेण्यात येत आहे. यंदाच्या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन आमदार बालाजी कल्याणकर यांच्या हस्ते बलुन व मशाल पेटवून करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे, सचिव श्यामल पत्की, सहसचिव ॲड. प्रफुल अग्रवाल, चिरंजीलाल दागडीया, प्रदिप नागापूरकर, दीपनाथ पत्की उपस्थित होते.

भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांच्या हस्ते क्रीडा महोत्सवातील विजेत्यांना पारितोषिक देण्यात आले. यावेळी डॉ. सुधीर कोकरे, अविनाश जाधव, उद्योजक विश्वजीत राठोड, सी. दागडीया, प्राचार्य डॉ. एल.पी. शिंदे, माजी प्राचार्य डॉ.डी.यु.गवई, प्राचार्य डॉ. आर. एम. जाधव, नितीन सेलमोकर, डॉ. सचिन पवार, डॉ. अरुणा शुक्ला, प्रा.एकनाथ खिल्लारे यांच्यासह कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. स्पर्धेचे निकाल व्हॉलीबॉल (महिला) प्रथम पीपल्स कॉलेज, व्दितीय सायन्स कॉलेज, तृतीय पीपल्स हायस्कूल. व्हॉली बॉल (पुरुष)- प्रथम सायन्स कॉलेज व्दितीय पीपल्स कॉलेज तृतीय पीपल्स हायस्कूल रस्सीखेच (पुरुष)-प्रथम सायन्स कॉलेज, व्दितीय पीपल्स हायस्कूल तृतीय पीपल्स कॉलेज. रिंग (महिला) प्रथम पीपल्स हायस्कूल, व्दितीय पीपल्स कॉलेज, तृतीय सायन्स कॉलेज. रिंग (पुरुष)- प्रथम व व्दितीय पीपल्स कॉलेज ए व बी टीम तर तृतीय पीपल्स हायस्कूल. रिंग स्पर्धा (पदाधिकारी) - प्रथम डॉ. प्रवीण पाटील, व्दितीय डॉ.डी.यू.गवई. बैटमिन्टन (महिला) प्रथम -माया राऊत, व्दितीय- जंपलकर, तृतीय- मोदी मॅडम. टेबल टेनिस (महिला) प्रथम-माया राऊत, व्दितीय -डॉ. शैलजा वडजे, तृतीय-डॉ. संगिता मोदी. टेबल टेनिस (पुरुष)-प्रथम पीपल्स कॉलेज, व्दितीय- पीपल्स हायस्कूल, तृतीय- सायन्स कॉलेज. क्रिकेट (पुरुष) प्रथम-सायन्स कॉलेज, व्दितीय-पीपल्स कॉलेज, तृतीय- पीपल्स हायस्कुल. चॅम्पीयन ट्रॉफी (पुरुष) सायन्स कॉलेज चॅम्पीयन ट्रॉफी (महिला) पीपल्स कॉलेज बॅटमिन्टन (पुरुष) रंजन राठोड, डॉ. प्रमोद कुलकर्णी, प्रा. दुल्लेवाड यांनी बक्षिस देण्यात आले. डॉ. आश्विन बोरीकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विनय कदम यांनी आभार मानले. स्पर्धेसाठी प्रा. विलास वडजे, प्रा. रंजन राठोड, सौ. कंधारे मॅडम, नवनाथ कदम, खलील बेग, भागोजी साळवे यांनी परिश्रम घेतले.

# सहयोगच्या विद्यार्थ्यांचा नांदेड पोलीस अधीक्षकांकडून सत्कार




**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी विधानसभा निवडणूक प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली. मतदारांमध्ये जागरूकता आणि निवडणूक प्रक्रियेतील योगदानाबद्दल त्यांचा आणि मार्गदर्शकांचा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी विद्यार्थ्यांचा अशा कार्यक्रमांतील सहभाग स्तुत्य असल्याचे नमूद केले. विद्यार्थ्यांचा सहभाग निवडणूक प्रक्रियेत लोकशाहीसाठी महत्त्वाचा ठरतो, असे नमूद केले. अशा उपक्रमांमुळे तरुणाईची जाणीवशक्ती जागृत होऊन त्यांना समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळते.

पोलीस अधीक्षक कार्यालयात हा कार्यक्रम घेण्यात आला. सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी भारतातील युवा हा भविष्याची संपत्ती आहे असे संबोधित करून विद्यार्थ्यांचा योगदानाचे कौतुक केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक प्रा.राज कदम, इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.विजय नवघरे यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमाबद्दल यावेळी माहिती दिली.

# श्री गुरुगोविंद सिंग यांच्या हातून धर्मरक्षणाचे कार्य

## पीपल्स हायस्कूलमध्ये जयंती सोहळ्यात नौनिहालसिंग जहागीरदार

**नांदेड (प्रतिनिधी)–** श्री गुरुगोविंद सिंघजी यांनी शोषण, अत्याचाराविरोधात संघर्ष केला. खालसा धर्माची स्थापना करून विखुरलेल्या हिंदू समाजाला एकत्र करून अन्यायाच्या विरोधात लढा देऊन हिंदू धर्म वाचवण्याचा महान कार्य केले, असे प्रतिपादन शालेय समिती अध्यक्ष नौनिहालसिंग जहागीरदार यांनी केले.

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पीपल्स हायस्कूलमध्ये श्री गुरु गोविंद सिंगजी यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.




याप्रसंगी मुख्याध्यापक नितीन सेलमोकर, पर्यवेक्षक प्रशांत चौधरी, कार्यकारी सदस्य राहुल गोरे, मुख्याध्यापिका सोनाली केंद्रे उपस्थित होत्या. प्रारंभी गुरुगोविंद सिंगजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रशांत चौधरी यांनी प्रास्ताविक, प्रफुल्लता फुलारी यांनी सूत्रसंचालन तर राहुल गोरे यांनी आभार मानले.

जागीरदार म्हणाले की, शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक यांनी पाखंडी लोकांविरुद्ध आवाज उठवून सामान्यांना अंधश्रद्धेतून बाहेर काढण्याचे आटोकाट प्रयत्न केले. गुरु गोविंद सिंग यांचे वडील गुरू तेगबहाद्दूर यांनी हिंदू धर्माच्या रक्षणासाठी स्वतचे बलिदान दिले. तर गुरु गोविंदसिंग यांनी शोषण, अत्याचाराविरोधात संघर्ष केला. आजही संघर्ष करण्याची गरज आहे. विज्ञानाच्या प्रगतीमुळे शासनकर्त्यांना अहंकार आला आहे. या अहंकाराविरुद्ध लढा देण्याची वेळ आली आहे, असे जहागीरदार म्हणाले.

याप्रसंगी विनोद टेकाळे, प्रसिद्धी विभाग प्रमुख व्ही. आर. चिलवरवार, पेदे, आडे, मंगनाळे, पल्लवी जंपलकर, सौ. सुरोसे, वैशाली ढवळे,आकाश भरणे, श्रीराम बोईनवाड, माधव लुट्टे यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# सिडको उद्यानाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क नाव घोषित करून परिसराचे सुशोभीकरण करण्याची मागणी




**नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको भागात असलेल्या उद्यानाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क नाव द्यावे. सदरील पार्कची मनपाच्या दप्तरी नोंद घेवून पार्क परिसराला विकसित करावे, अशी मागणी नवीन नांदेड सिडको भागातील समाज बांधवांच्या वतीने मनपा आयुक्तांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनावर पी.एम. वाघमारे, विठ्ठल गायकवाड, डॉ. करुणाताई जमदाडे, भी. ना. गायकवाड, श्याम कांबळे, नरसिंग दरबारे, अनिल बेर्जे, अमृत नरंगलकर, साहेबराव भंडारे, अशोक मगरे, भीमराव बेरजे, पंडित सोनकांबळे, राजू जमदाडे, राघोजी वाघमारे, प्रदीप जोगदंड, विशाल जोंधळे, दिलीप लांडगे, यशपाल वाडे, संदीप महाबळे, अमरदीप हरणावळे, राजू वाघमारे, मोतीराम गायकवाड, नंदकुमार गच्चे, रमेश झगडे, मनोहर कोकरे, एस. एस. भंडारे, यु.के कांबळे, डी. एन., गोधने, ॲड. जी. टी. ढगे, श्रीरंग मगरे, विनोद लोखंडे, शिवाजी गोडबोले, गुरुचरण मस्के, राघोजी जोगदंड, केशव कांबळे, विजय भंडारे, भगवान जमदाडे, गौतम सोनसळे, शामराव कांबळे, दीपक सोनकांबळे, प्रवीण लांडगे, किशन वावळे, विलास ढवळे, हरी कसबे, बी. डी. कांबळे, सुरेश पवळे, साहेबराव ढवळे, भगवान जमदाडे यांसह ३५०हून अधिक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# नरसीत दर्पण दिन साजरा



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** नायगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने नरसी येथे ६ जानेवारी रोजी दर्पण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी दर्पणकारांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी जिल्हाध्यक्ष सूर्यकांत सोनखेडकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रभाकर लपत्रेवार, रघुनाथ सोनकांबळे, प्रा. डॉ. दयानंद माने, पंडीत वाघमारे, सुभाष पेरकेवार, लक्ष्मण बरगे, आदीं उपस्थिती होते.

प्रथम दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. प्रजावाणीचे उपसंपादक संजय बुडकेवार आणि अर्धापूर पंचायत समितीच्या माजी सभापती प्रभावती तुकाराम चिंचलवाड यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी तालुक्यातील समस्त पत्रकार उपस्थित होते.

# 'साथ देऊ एका हाकेला पाच मुठ्ठी अनाज' या संकल्पनेला प्रतिसाद

**माहूर (प्रतिनिधी)–** येथील जीनियस किड्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'साथ देऊ एका हाकेला पाच मुठ्ठी अनाज' उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत अन्नधान्यासह इतर आवश्यक साहित्य वृद्धाश्रमाला भेट देण्यात आले.



शाळेमध्ये एक जानेवारी रोजी वेगवेगळ्या प्रकारचे धान्य ३ क्विंटल गहू, २ क्विंटल तांदूळ, ५० किलो ज्वारी,५० किलो तूरडाळ, ५० किलो चणाडाळ, व इतर काही साहित्य, तसेच शाहू फाऊंडेशन च्या वतीने ५००० रुपये रक्कम, सर्व वृद्धांना केळी, झेंडू बाम व चॉकलेट्स जमा करण्यात आले. ५ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांना सोबत नेऊन आर्णी येथील मातोश्री सुशीलाबाई नागपुरे वृद्धाश्रमाला मदतीचा हात म्हणून देण्यात आले.

'वृद्ध सेवा हीच ईश्वरसेवा' समजून विद्यार्थ्यांनी भविष्यात कधीही वृद्धाश्रम सुरु करण्याची गरज पडू देणार नाही. इथे येऊन आम्हाला वृद्धांच्या अडचणी व भावना समजून घेण्याची संधी जिनियस किड्स स्कूलचे अध्यक्ष भाग्यवान भवरे यांनी दिल्याबद्दल विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी शाळेचे संस्थापक अध्यक्ष भाग्यवान भवरे तसेच सचिव शितल भवरे, उपमुख्याध्यापक आहेफाज, वैभव मुडाणकर, आकाश राठोड, शुभम भवरे,अश्विनी भास्करवार, राजू गुल्फुलवार, नंदा दातीर, परीहार, कुंभारे, रचना निळे, चंचल भवरे, साबळे, नागेश महल्ले, अनिल, विकास, स्वाती, संगीता सोनवणे, संगीता डहाळे, लक्ष्मी, शांता, नववी व दहावीचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# मस्साजोग घटनेचा ओबीसी संघटनांकडून निषेध



**किनवट (प्रतिनिधी)–** बीड जिल्ह्याच्या मस्साजोग येथील सरपंच चंद्रकांत देशमुख यांच्या निर्घृण हत्येचा किनवट - माहूर ओबीसी संघटनांनी निषेध केला आहे. दरम्यान,मंत्री धनंजय मुंडे यांच्याविरुद्ध प्रक्षोभक वक्तव्य करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणीही मंगळवारी दि.७ करण्यात आली आहे.

यासंदर्भात येथील सहायक जिल्हाधिकारी व पोलीस निरीक्षक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मस्साजोग येथील सरपंच देशमुख यांची हत्या निषेधार्ह आहे.या घटनेचा आम्ही तीव्र निषेध करतो.मस्साजोग घटनेनंतर परभणी येथे आयोजित मोर्चानंतरच्या सभेत बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांच्याविरोधात आक्षेपार्ह वक्तव्य करून त्यांना घरात घुसून मारहाण करण्याची तसेच त्यांना रस्त्यावर फिरू न देण्याची धमकी दिली.जरांगे पाटील यांचे वक्तव्य चिथावणीखोर व जातीय तेढ निर्माण करणारे आहे.याही घटनेचा आम्ही निषेध करतो.या वक्तव्याप्रकरणी मनोज जरांगे यांच्यावर गुन्हा दाखल करावा,अशी मागणी ओबीसी संघटनांनी केली आहे.

# सेवानिवृत्त शिक्षण संचालक झाले शिकवण्यात मग्न

**नांदेड (प्रतिनिधी) –** दहीकळंबा (ता. कंधार) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सेवानिवृत्त शिक्षण संचालक गोविंद नांदेडे यांनी चक्क सुंदर वर्ग घेतला. इयत्ता पहिली ते आठवीच्या मुलांना शिकवण्यात ते इतके मग्न झाले की सारा गाव हे सुंदर दृश्य पाहायला जमला होता.

माधवराव पांडागळे गुरुजींच्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे शिक्षक असलेले पुत्र दत्तप्रसाद पांडागळे यांच्यावतीने २०० विद्यार्थ्यांना दप्तर, शैक्षणिक साहित्य नांदेडे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.



यानिमित्त आयोजित कार्यक्रमात कार्यक्रमारंभी राज्याचे माजी शिक्षण संचालक एक तासभर आधीच शाळेत आले.. मुले कोवळ्या उन्हात मैदानावर बसलेली होती. त्यांनी मुलांशी अनौपचारिक संवाद प्रारंभ केला.. मुलांना त्यांच्या मनमोकळ्या, दर्जेदार शिकवण्यात आनंद मिळत असल्याचे विद्यार्थ्यांच्या सुंदर प्रतिसादावरून लक्षात येत होते. शिक्षण संचालक हसत, खेळत, गप्पा करत, गोष्टी सांगत प्रश्न विचारायचे आणि उत्तरासाठी अनेक हात वर यायचे. ज्यांने समयसूचकतेने उत्तर देऊन आपल्या प्रतिभेची चुणूक दाखवली अशा विद्यार्थ्यांना डॉ नांदेडे रोख रकमेचा पुरस्कार देऊन कौतुक करायचे आणि सारा गाव टाळ्या वाजवून या सुंदर क्षणाचे आणि प्रसंगाचे कौतुक करायचा. शिक्षण संचालकांनी वय आणि वर्गानुरुप प्रश्न विचारायचे आणि मुलांनी क्षणार्धात प्रतिसाद द्यायचा हे विहंगम दृश्य आलेले प्रमुख अतिथी आणि सारे गावकरी माता पालक कृतार्थ भावनेने पहात होते. आपली मुले इतकी तत्परतेने कठीण वाटणाऱ्या प्रश्नांना अचूक उत्तरे देत आहेत याचे कौतुक करत पालक हे दृश्य न्याहाळत होते. मुख्याध्यापक संजय धुत आणि शिक्षक आपल्या या लाडक्या विद्यार्थ्यांचे हे कौतुक डोळे भरून पाहत होते. शिक्षण संचालकांनी सर्व शिक्षकांचे आणि राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श केंद्र प्रमुख प्रवीण पाटील यांचे मुलांच्या या सुंदर प्रतिसादाचे कौतुक करून अभिनंदन केले.

यावेळी पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे, मालीपाटील व्यंकटराव पांडागळे, शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष दत्तप्रसाद पांडागळे, शिवराम पांडागळे, गावाचे सरपंच अवधूत शिंदे व पालक उपस्थित होते.

# महापालिकेच्या सिडको क्षेत्रिय कार्यालयांतर्गत ४ नळ जोडणी खंडीत

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेच्या सिडको क्षेत्रिय कार्यालयाच्या कर वसुली पथकाने चार मालमत्ताधारकांची नळ जोडणी खंडित केली आहे. क्षेत्रिय अधिकारी मिर्झा फरहतउल्ला बेग, कार्यालय अधिक्षक विलास गजभारे यांच्या नियंत्रणाखाली कर निरीक्षक सुधिरसिंह बैस, वसुली लिपिक मालु एनफळे व मारुती सारंग यांनी ही कारवाई केली.

महापालिकेच्या सिडको क्षेत्रिय कार्यालयाच्या कर वसुली पथकाने दि. ८ जानेवारी रोजी मालमत्ता धारक शैलादेवी किरणसिंग तौर यांच्याकडे २,२९,७७० रुपये, बसवेश्वर मारोतराव कानोले यांच्याकडे २,०३,९९९ रुपयांचा कर व सौ.कमलबाई गेंदराव यांच्याकडे २,१७,७०७ रुपये आणि मालमत्ता भिमराव जोंधळे यांच्याकडे २,४१,५७२ रुपयांचा कर थकीत आहे. सदरील कराची रक्कम भरण्यासाठी वरील मालमत्ताधारकांनी असमर्थता दर्शविल्यामुळे संबंधित मालमत्ता धारकांचे नळ खंडीत करण्यात आले आहेत.

सदरील कार्यवाही क्षेत्रिय अधिकारी मिर्झा फरहतउल्ला बेग, कार्यालय अधिक्षक विलास गजभारे यांच्या नियंत्रणाखाली कर निरीक्षक सुधिरसिंह बैस, वसुली लिपिक मालु एनफळे व मारुती सारंग यांनी पार पाडली आहे. शहरातील नागरिकांनी चालु व थकीत कराचा भरणा करून करुन महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांनी केले आहे. तर यापुढेही जप्तीची कारवाई सुरुच राहील, असे उपायुक्त अजितपालसिंग संधु यांनी सांगितले आहे.

CMYK

# युवा

## हेवा वाटावा म्हणून फ्लर्ट? शुद्ध मूर्खपणाच !

**जोडीदारांना जवळ आणण्यासाठी हेवा वाटावा असा फॉर्म्युला प्रत्येकजण अवलंबतो. पण अभ्यास वाचून तुम्ही हे काम लगेच थांबवाल. होय, लोकांना वाटते की ते त्यांच्या नातेसंबंधात फायदेशीर आहे, परंतु अभ्यासानुसार, तुमचे मोठे नुकसान होऊ शकते. तुमच्या जोडीदाराला हेवा वाटावा यासाठी तुम्ही इतरांशी फ्लर्ट करत असाल तर अभ्यासानुसार त्याचे तोटे जाणून घ्या...**

जिथे प्रेम आहे तिथे भांडण देखील आहे. निरोगी नात्यातही चढ-उतार असतात. दरम्यान, काही लोक आपले प्रेम पटवून देण्यासाठी ईर्ष्यायुक्त फॉर्म्युला अवलंबतात. हेवा वाटू लागल्यावर जोडीदार जवळ येईल, असा विचार करून ते कुठूनतरी फ्लर्ट करायला लागतात. हे सूत्र काही प्रकरणांमध्ये कार्य करत असले तरी प्रत्येक वेळी असेच घडते असे अजिबात नाही. खरं तर, एका अभ्यासात तुम्ही जे विचार करता त्यापेक्षा पूर्णपणे वेगळं काहीतरी दाखवलं आहे, ज्यामध्ये तुमच्या पार्टनरला मत्सर वाटण्याचं फायदे तोट्यांपेक्षा जास्त आहेत. इथे तुमची चाल उलटसुलट होऊ शकते, एवढेच नाही तर नातेही बिघडू शकते. याद्वारे तुम्ही मूर्ख असल्याचेही सिद्ध होऊ शकता.



### जोडीदाराच्या हृदयात अंतर वाढते

जर्नल ऑफ सेक्स रिसर्चमध्ये प्रकाशित झालेल्या एका नवीन अभ्यासात असे दिसून आले आहे की जेव्हा तुम्ही बाहेरच्या व्यक्तीला तुमच्या जोडीदारासोबत फ्लर्ट करताना पाहता तेव्हा ते तुमच्यापासून दूर जातात. त्यांचे तुमच्याबद्दलचे आकर्षण वाढण्याचे कारण कमी होऊ लागते. जरी तो तुमच्या इश्कबाजीला प्रतिसाद देत नसला तरीही, तुमच्याबद्दलच्या त्याच्या भावना वाढण्यास कमी जागा आहे.

### जोडीदारामध्ये असुरक्षितता वाढते

इस्त्रायलमधील हर्झलिया येथील रीचमन विद्यापीठ आणि अमेरिकेतील रॉचेस्टर विद्यापीठातील संशोधकांनी याबाबत वेगळीच कहाणी मांडली आहे. अशा घटनांमुळे दोघांमधील विश्वासाला आव्हान देण्याऐवजी असुरक्षितता वाढते असे मानणारे. असुरक्षिततेच्या भीतीने नाती कमकुवत होतात.

### जोडीदाराला भीती का वाटते ?

संशोधकांचे म्हणणे आहे की या स्थितीत, जोडीदार आपल्या प्रियकरामध्ये स्वारस्य असलेल्या दुसऱ्या व्यक्तीला संभाव्य प्रतिस्पर्धी म्हणून पाहू लागतो जो आपल्या प्रियकराची चोरी करू शकतो. तुमचा जोडीदार गमावण्याच्या या भीतीमुळे असे वातावरण निर्माण होते की त्यांचे तुमच्याकडे असलेले आकर्षण कमी होते आणि विभक्त होण्याकडे कल वाढतो. कारण जेव्हा नातं तयार होतं, तेव्हा जोडीदाराला भुरळ घालणाऱ्या कोणत्याही गोष्टीची काळजी वाढते, असं वाटतं की कोणीतरी आपल्या प्रियकराला भुलवू शकेल. या काळात विभक्त होणे हा त्यांचा स्वाभिमान जपण्याचा आणि त्यांना भावनिक दुखावण्यापासून वाचवण्याचा प्रयत्न असतो. परंतु, यामुळे भविष्यात नातेसंबंध खराब होऊ शकतात.

### नकारात्मक आणि सकारात्मक

संशोधकांनी देखील जोर दिला की लोक त्यांच्या भागीदारांना नातेसंबंधात जवळ ठेवण्यासाठी सकारात्मक आणि नकारात्मक धोरणांचा अवलंब कसा करतात. सकारात्मक गोष्टींमध्ये भेटवस्तू देणे आणि एकत्र गुणवत्तापूर्ण वेळ घालवणे यासारख्या क्रियाकलापांचा समावेश होतो. नकारात्मक असताना भागीदाराच्या वेळेवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करणे समाविष्ट असू शकते. पण जेव्हा एखाद्याला असुरक्षित वाटतं आणि आपल्या जोडीदारासोबत कुणी फ्लर्ट करताना दिसलं, तेव्हा तो प्रेम व्यक्त करण्यात मागे राहतो. त्यामुळे तुमच्या जोडीदाराला आनंदी ठेवण्यासाठी तुम्ही इतर काही उपाय करून पाहू शकता.





## नव्याने प्रेमात पडणाऱ्यांसाठी...

**नव्याने प्रेमात पडलेल्या आणि नवं नात जुळलेल्या जोडप्यांना प्रेमात नक्की कसं वागावं हे माहित नसतं, अर्थात यात त्यांची काही चुकी नाही. अनुभव आला की त्यांना बऱ्याच गोष्टी कळतात. पण या अजाणतेपणामुळे त्यांच्याकडून बऱ्याच चुका सुद्धा होतात. आपल्या पार्टनरशी कसं बोलावं, त्याला कसं समजून घ्यावं, काही समस्या असल्यास कशी दूर करावी या गोष्टी माहीत नसल्यामुळे अनेक चुका होत जातात आणि त्याचा थेट परिणाम नात्यावर होऊन नातं देखील तुटू शकतं. रिलेशनशिपच्या सुरुवातीला कसं वागावं ? नातं कसं फुलवावं हे माहीत असेल आणि कोणत्या चुका टाळाव्यात याबद्दल जाणीव असेल तर पुढचे धोके टळेल जातात आणि नातं अधिक प्रेमळ होतं. तसेच पार्टनरला सुद्धा विश्वास बसतो की आपण योग्य जोडीदाराची निवड केली आहे. चला तर आपण जाणून घेऊया अशा कोणत्या चुका आहेत ज्या नवीन कपल्सनी अजिबात करू नयेत...**

### अधिकार गाजवणे

नव्याने प्रेमात पडलेले कपल्स बऱ्याचदा एकमेकांवर हक्क आणि अधिकार गाजवू लागतात, अर्थात सामान्यतः ही भावना आपला जोडीदार आपल्यापासून दूर जाऊ नये, आपण त्याला गमावू नये यातून निर्माण होते. अनेक प्रकरणात असे दिसून आले आहे की असा अधिकार गाजवणे हे कपल्सना सुरुवातीला आवडू लागतं, पण जसा जसा काळ सरता जातो तस तसा त्यांना या गोष्टीचा कंटाळा येऊ लागतो. आपल्या जोडीदाराने आपल्या गोष्टींवर अधिकार गाजवणे ही गोष्ट त्याला त्रासदायक वाटू लागते. याचा थेट परिणाम नात्यावर होऊन नातं बिघडू शकतं.

### अविश्वास दाखवू नका

नवीन रिलेशनशिपमध्ये आपण आपल्या जोडीदाराला जास्त ओळखत नसल्याने अनेक गोष्टींबाबत आपल्याला शंका येऊ शकते. पण अशावेळेस थेट जोडीदारावर आरोप करून अविश्वास दाखवणे चुकीचे आहे. यातून तुमचा त्यांच्यावर अजिबात विश्वास नाही असे त्यांना वाटू शकते. जोवर तुमच्या हातात एखाद्या चुकीच्या गोष्टीबाबत ठोस पुरावा नसले तोवर त्याबद्दल जाब विचारू नये. जास्तीत जास्त विश्वास ठेवावा, अशामुळे जोडीदाराच्या मनातही तुमच्याबद्दल आदर निर्माण होऊ शकतो. तर मंडळी तुम्ही नवीन रिलेशनशिप मध्ये असाल तर या गोष्टी आवर्जून लक्षात ठेवा आणि आम्ही सांगितलेल्या या चुका टाळून आपलं नातं अधिक यशस्वी करा.

### भावना व्यक्त करणे

अनेकदा असं दिसून येतं की प्रेम करणारे लोक एकमेकांसमोर आपल्या भावना व्यक्त करण्याची घाई करतात. आता या भावना म्हणजे कोणत्या? तर पहिल्या दुसऱ्या भेटीतच मी आयुष्यभर तुला साथ देईल, सात जन्म तुझ्यासोबत राहीन अशा आणाभाका घेणे किंवा लग्नाची मागणी घालणे होय. अजिबात या भावना व्यक्त करताना घाई करू नका. कारण तुम्ही तुमच्या जोडीदाराला नीट ओळखत नसता आणि अशावेळी त्याला नीट जाणून न घेता आयुष्यभर त्याच्या सोबत राहण्याचे वचन त्याला देणे चूक आहे. पुढे जाऊन हा आपला जोडीदार होण्या योग्य नाही असंही तुम्हाला वाटू शकतं. म्हणून भावना व्यक्त करताना घाई करू नका.

### सारखं सारखं ओरडू नका

बऱ्याचदा असं होतं की तुम्हाला न आवडणाऱ्या गोष्टी तुमचा जोडीदार करत असेल आणि तुम्ही तुमच्या जोडीदाराला सारखे ओरडत असाल, पण असं अजिबात करू नका. कारण अशाने तुमचा जोडीदार तुम्हाला कंटाळू शकतो. नात्याच्या सुरुवातीच्या काळात नात्याचे बंध नाजूक असतात आणि अशा वागण्यामुळे ते बंध तुटायला जास्त वेळ जात नाही. कारण हे असं वागणं म्हणजे तुम्ही आपल्या जोडीदाराला स्वतःच्या मुठीत ठेवताय असं प्रतीत करतं.

### अपेक्षा ठेवू नका

नव्याने रिलेशनशिपमध्ये आल्यावर कधीच आपल्या पार्टनरकडून जास्त अपेक्षा लगेच ठेवू नयेत. कधी कधी कपल्स असा विचार करतात की जसं आपण आपल्या जोडीदाराबाबत फील करतो, तसंच आपला जोडीदार सुद्धा आपल्याबाबतीत फील करतो. पण मनुष्याच्या मनाची शाश्वती कोणी देऊ शकत नाही. त्यामुळे आपल्या जोडीदाराकडून कधीच अपेक्षा ठेवू नये. किमान ५-६ महिने ती व्यक्ती तुमच्यावर प्रामाणिकपणे प्रेम करत नाही तोवर तरी अपेक्षा ठेवणे चूक आहे.

## कॉलेजमध्येच प्रेमात पडलात ?

**जगात अशी कितीतरी जोडपी आहेत जी कॉलेजमध्ये असताना एकमेकांच्या प्रेमात पडतात आणि हा प्रेमाचा प्रवास लग्न करून पूर्णत्वास नेतात. एकमेकांसोबतचा हा प्रवास नक्कीच त्यांच्यासाठी संस्मरणीय असतो. पण मित्र-मैत्रीणींनो प्रत्येक वेळीच लहान वयात झालेलं प्रेम त्याच्या ध्येयापर्यंत पोहचताना सहजासहजी मार्ग काढेल असं नाही. कधी कधी हेच प्रेम आपल्या आयुष्यात संकटांचा डोंगर बनूनदेखील येऊ शकतो. प्रेमात पडलेली मुलं-मुली डोक्याने विचार करण्यापेक्षा हळवे होऊन मनाने किंवा हदयाने निर्णय घेतात. ज्यामुळे अशा काही गोष्टी घडतात की त्याचा पश्चाताप त्यांना आयुष्यभर करावा लागतो. असं होऊ नये म्हणून काही गोष्टींची काळजी घेणं अत्यंत गरजेचं आहे. त्या काही नाजूक गोष्टी आम्ही तुम्हाला सांगणार आहोत...**

- अभ्यासावर लक्ष केंद्रित करणं : हल्लीची बरीच मुलं-मुली कॉलेजमधील आपल्या एखाद्या मित्राच्या किंवा मैत्रिणीच्या प्रेमात पडतात. येथून सुरू झालेली प्रेमकहाणी ही अनेक साहसांनी भरलेली आणि भावनिक बंधात बांधली गेलेली असते. त्यामुळे अशा परिस्थितीत बरेचजण अभ्यासापेक्षा प्रेमाला आणि नात्याला जास्त महत्त्व देऊ लागतात. यामुळे त्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ शकते. त्याचा परिणाम रिझल्टवर देखील पडू शकतो. त्यामुळे करिअर डोळ्यांपुढे ठेवून जास्तीत जास्त मार्क्स पाडण्याचा प्रयत्न करा. कारण जे नातं मुळतः मजबूत आहे ते कधीच तुटणार नाही.



- पैसे खर्च करणे : प्रेयसीला महागड्या भेटवस्तू देणे, प्रियकराला खुश करण्यासाठी सरप्राईज देणे आणि फिरायला जाण्यासारख्या गोष्टी या जोडप्यांमध्ये अगदी साधारण आहेत. पण यात जी सगळ्यात महत्वाची गोष्ट असते ती म्हणजे पैसा! या सर्व गोष्टींसाठी पैशांची गरज भासते आणि कॉलेजमधील मुलांकडे पैसे नसल्याने पैशांसाठी ते साहाजिकच आई-वडिलांवर अवलंबून राहतात. आई-वडिलांनी पैसे न दिल्यास ते मित्रांकडून उधारी घेतात आणि जेव्हा ही रक्कम चुकती करण्याची वेळ येते तेव्हा मात्र संकटाचा डोंगरच या जोडप्यांवर कोसळतो.
- शारीरिक जवळीक : ही गोष्ट फारच संवेदनशील आहे. प्रेमात आकंठ बुडालेल्या जोडप्यांसाठी शारीरिक जवळीक फारच सामान्य गोष्ट आहे. पण कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलांनी असं करणं म्हणजे संकटांना निमंत्रण देण्यासारखं आहे. कारण थोडासा निष्काळजीपणा केल्यानेही मुलींना गर्भवती राहण्याचा धोका आणि एसटीडी (Sexual transmitted diaseases) सारख्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. यामुळे भविष्यदेखील धोक्यात येऊ शकतं. त्यामुळे जोपर्यंत तुम्ही लग्नाच्या वयास पात्र होत नाही किंवा त्या वेळेपर्यंत नातं घेऊन जात नाही तोपर्यंत शारीरिक जवळीकीपासून दूर राहिलेलंच उत्तम!



- गैरफायदा घेणं : कॉलेजमध्ये अशी बरीच मुलं-मुली असतात जी स्वतःच्या आनंदासाठी, आरामदायी जीवनासाठी प्रेमप्रकरण सुरू करतात. त्यामुळे अशा नात्यांमध्ये प्रेम नसतं आणि कॉलेज संपताच ही नातीदेखील तुटतात. अशावेळी सर्वात जास्त त्रास त्या व्यक्तीला होतो जो खरोखर मनापासून त्या नात्यात गुंफलेला असतो. अशा परिस्थितीत बरेचदा ब्लेकमेल आणि शारीरिक अत्याचारासारख्या गोष्टी देखील घडतात आणि पोलिसांची मदत घ्यावी लागते. त्यामुळे प्रेमात पडताना अशा व्यक्तीच्या प्रेमात कधीच पडू नका, ज्याच्यासाठी प्रेम हे टाइमपासचं साधन आहे.

## लग्नाचे पहिले ६ महिने...


**कोणीतरी अगदी बरोबरच म्हटले आहे की लग्न म्हणजे प्रेम आणि आव्हानांनी भरलेला एक सुंदर जीवन प्रवास आहे, ज्यामध्ये तुम्ही तुमच्या जोडीदारासोबतच वाढता नाही तर दररोज काहीतरी नवीन शिकता. हे असे नाते आहे जे आनंदासोबतच जबाबदाऱ्याही देते, जिथून केवळ नवीन जीवन सुरू होत नाही तर जीवन जगण्याची पद्धत पूर्णपणे बदलते.**

लग्नानंतर मुलगा आणि मुलगी दोघांच्याही जीवनात अनेक बदल होत असले तरी त्याचा सर्वाधिक परिणाम घरातील सुनेवर होतो. याचे कारण असे की आपल्या पतीला आनंदी ठेवण्यासोबतच तिच्या सासऱ्यांसोबत आणि वहिनींसोबत घट्ट नाते निर्माण करण्याचाही दबाव असतो, ज्यासाठी खूप संयम आणि धैर्य आवश्यक असते. याचं सर्वात मोठं कारण म्हणजे या काळात छोट्या-छोट्या चुका आणि गैरसमजांमुळे नात्यात दुरावा तर निर्माण होतोच पण गोष्टीही पूर्वीसारख्या राहत नाहीत. म्हणूनच असं म्हटलं जातं की, लग्नाचे पहिले ६ महिने जर तुम्ही चांगले घालवले तर कोणत्याही प्रकारची समस्या उद्भवणार नाही

- आईच्या कुटुंबाला संभाषणात आणू नका : हे नाकारता येत नाही की लग्नानंतर कोणत्याही मुलीसाठी आपले कुटुंब सोडणे सोपे नसते. परंतु आता तुम्हाला हे समजले पाहिजे की तुमचे नवीन कुटुंब तयार झाले आहे, जिथे जीवनाचे मार्ग पूर्णपणे भिन्न आहेत. अशा वेळी तुमच्या घरात जे काही घडले ते तिथेच राहू द्या. आता तुम्ही इथल्या पद्धतींशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करा. लग्नानंतर सासू-सासरे आणि वहिनी यांच्यातील नाते घट्ट ठेवायचे असेल तर दोन्ही कुटुंबांची तुलना टाळा.
- आवडी-निवडी सांभाळा : तुम्हाला तुमच्या सासरच्या लोकांमध्ये तुमचे स्थान खरेच बनवायचे असेल तर आधी त्यांच्या आवडी-निवडी जाणून घेण्याचा प्रयत्न करा. आवडी-निवडी जाणून घेतल्यानंतर त्यानुसार वागल्यास नात्यात गोडवा येऊ शकतो. तथापि, आमचा विश्वास आहे की कोणतेही नाते मजबूत करण्यासाठी एका बाजूने नाही तर दोन्ही बाजूंनी प्रयत्न करावे लागतात. पण सुरुवातीला तिच्या आवडीनिवडींना प्राधान्य दिल्यास सासू-सासरेही तिची स्तुती करण्यात मागे राहणार नाहीत.
- मदत करण्यास तयार रहा : लग्नानंतर नवीन नातेसंबंधांचा पाया मजबूत करण्यासाठी घरातील छोट्या छोट्या कामात मदत करण्यास तयार राहा. कुटुंबातील एखाद्याला तुमची गरज असेल तर त्यांना मदत करा. याचे कारण असे की अनेक मुलींना लग्नानंतरही फक्त त्यांचे कामच करायला आवडते, हा अत्यंत चुकीचा मार्ग आहे. आता तुमच्यावर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. अशा परिस्थितीत, आपण एकटे नाही आहात हे समजून घेणे आवश्यक आहे. तुमचा इतरांनाही उपयोग झाला पाहिजे.

## नातं संपवण्याआधी ५ गोष्टींचा विचार कराच...

**आपली इच्छा असल्याशिवाय नाती संपू शकत नाहीत. कारण जेव्हा तुम्ही एखाद्यावर मनापासून प्रेम करता तेव्हा तुम्ही त्याला गमावण्याचे स्वप्नही पाहू शकत नाही. पण अनेक वेळा नातं अशा वळणावर येतं जिथे सगळे रस्ते बंद वाटतात. तुमच्यासोबतही असे होत असेल तर तुम्ही या गोष्टी करून पहा...**



नात्यात फक्त प्रेमच नाही तर कडू-गोड वादही आवश्यक असतात. चढ-उतार, कुरबुरी, कुरबुरी दूर करूनच पुढे जावे लागते. पण कधी कधी छोट्या छोट्या गोष्टी मोठ्या गोष्टी बनतात, रोजच्या भांडणांना कंटाळा येतो आणि नातं संपवल्यासारखं वाटतं, पण प्रेम असं होऊ देत नाही. तो पुन्हा पुन्हा म्हणतो, निदान संधी तरी द्या. मग काय करावे आणि कोणत्या आधारावर संधी द्यावी हेच समजत नाही. तुम्हीही या नात्याच्या कोंडीत अडकला असाल तर जास्त विचार करू नका. कारण आम्ही तुम्हाला काही गोष्टी सांगणार आहोत ज्याकडे लक्ष देऊन तुम्ही तुटण्याच्या मार्गावर असलेले नाते पुन्हा जोडू शकता. कोणास ठाऊक, एकदा आपण जवळ झालो की सर्व काही चांगले होईल.

- नात्यात सुधारणा होण्यास किती वाव ? : सर्वात आधी हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा की, नात्यात सुधारणा होण्यास खरोखर वाव आहे का. कारण संघर्ष प्रत्येक नात्यात होतो. पण शेवटचा पर्याय ब्रेकअप हाच असेल असे नाही. त्यामुळे प्रत्येक पैलू समजून घेऊन निर्णय घ्या, जर एका प्रयत्नानेही तुम्हाला काम करता येत असेल तर नक्कीच प्रयत्न करा.
- स्वतःला समजून घ्यायला सुरुवात करा : तुमच्यासाठी काय योग्य आणि काय अयोग्य हे तुमच्यापेक्षा चांगले कोणीही जाणू शकत नाही. त्यामुळे नाती तुटण्यापासून वाचवण्यासाठी स्वतःशी बोला आणि जाणून घ्या की या नात्यात राहणे तुमच्यासाठी किती महत्त्वाचे आहे. उद्या तुमचा पार्टनर तुमच्यापासून दूर गेला तर त्यामुळे तुम्ही स्वतःवर नियंत्रण ठेवू शकाल की नाही, याचा तुमच्या जीवनावर किती परिणाम होईल.
- वाटाघाटीतून तोडगा काढा : प्रत्येक समस्या बोलून सोडवता येते हे सर्वांनाच माहीत आहे. अशा स्थितीत संबंध बिघडत असल्याचे दिसत असेल तर चर्चेवर भर द्या. एकमेकांसोबत बसा आणि प्रत्येक समस्येवर मोकळेपणाने बोला. तुम्हाला तुमच्या जोडीदाराची कोणती समस्या आहे किंवा त्याला तुमच्याकडून काय हवे आहे ? ते एकमेकांना समजून घेण्याचा आणि समजावण्याचा प्रयत्न करतात.
- छोटे प्रयत्न मोठे काम करतील : अनेकवेळा नाती तुटण्याचे कारण मोठे भांडण नसून नकळत झालेल्या छोट्या छोट्या चुका असतात. कारण आनंद हा छोट्या छोट्या गोष्टीतच दडलेला असतो. त्यामुळे नात्यात जोडीदाराच्या इच्छेकडे दुर्लक्ष करू नका. एकमेकांना समजून घेताना काहीतरी करून आनंदी राहण्यावर भर द्या.
- सकारात्मक गोष्टींवर लक्ष केंद्रित करा : नाती कमकुवत होण्यामागचे सर्वात मोठे कारण म्हणजे अनेकवेळा आपण फक्त चुका पाहतो आणि सकारात्मक दृष्टिकोनाचा विचारही करत नाही. परिणामी, नकारात्मकता इतकी वरचढ होते की चांगलेही चुकीचे दिसते. म्हणूनच, सकारात्मक गोष्टींकडे देखील लक्ष देण्याचा प्रयत्न करा, तुमच्या जोडीदाराच्या प्रत्येक पैलूकडे लक्ष द्या.

# दस्तनोंदणी आता ‘पेपरलेस’

## ‘आय सरिता २.०’ संगणकप्रणाली सहा महिन्यांत सेवेत

**मुंबई (प्रतिनिधी)** – दुय्यम निबंधक कार्यालयात दस्तनोंदणी करण्यासाठी अनेकदा विलंब होतो. जादा पानांच्या कागदपत्रांचा संच हाताळणे अवघड होते. अनेकदा त्यातील कागदपत्रे गहाळ होण्याची शक्यता असते. या सर्व पारंपरिक प्रक्रियेला फाटा देण्यासाठी नोंदणी मुद्रांक शुल्क विभागाने ‘आय सरिता २.०’ ही अद्ययावत संगणकप्रणाली आणण्याची तयारी सुरू केली आहे. पुण्यासह राज्यातील सर्वच दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये दस्त नोंदणी आता ’पेपरलेस’ होणार आहे. ही संगणकप्रणाली येण्यास आणखी सहा महिन्यांचा कालावधी लागणार आहे. यामुळे कागदपत्रे, दस्तांच्या स्कॅनिंगचा त्रास वाचणार असून, रेकॉर्डचे डिजिटायझेशन होणार आहे.

### अशी होती दस्तनोंदणीची प्रक्रिया

वर्षानुवर्षे दस्ताचा मजकूर तयार करून त्याची प्रिंट काढण्यात येते. दस्ताला लागणाऱ्या मुद्रांक शुल्काचे चलन काढून ते भरण्यात येते. दस्तासाठी आवश्यक अकृषक दाखला (एनए), सातबारा, प्रॉपर्टी दकार्ड, आधार कार्ड यासारखे विविध कागदपत्रे, प्रतिज्ञापत्रेही जोडली जातात. वकिलामार्फत दुय्यम निबंधक कार्यालयांत प्रत्यक्षात दस्ताची नोंदणी करण्यात येते. त्यासाठी सुमारे अर्धा तास लागतो. दस्तनोंदणीसाठी सध्या दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये टोकन पद्धती अस्तित्वात आहे. दिलेल्या टोकनाच्या वेळेनुसार, दस्त नोंदणी करण्यासाठी पक्षकार, वकील कार्यालयात येतात. त्यानंतर प्रक्रिया पूर्ण होते.

पारंपरिक दस्तनोंदणीची पद्धत आता कालबाह्य होणार आहे. नव्याने बदल होणाऱ्या ‘आय सरिता २.०’ या संगणक प्रणालीमुळे दस्तनोंदणी अगदी सोपी होणार आहे. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राच्या (एनआयसी) मदतीने ही संगणकप्रणाली तयार करण्यात येत आहे. नोंदणी मुद्रांक शुल्क विभागाच्या संकेतस्थळावर आता नवी ‘विंडो’ खुली होणार आहे. त्यासाठी वकील, पक्षकार किंवा दस्त करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला स्वतःचे ‘लॉग इन’ करावे लागेल.

‘लॉग इन’ केल्यानंतर संकेतस्थळावर दस्ताचा तयार करण्यात येणारा मजकूर हा त्यावर टाकणे शक्य होईल. त्याच वेळी दस्तासाठी आवश्यक असलेले प्रतिज्ञापत्र, अकृषक (एनए) परवाना, महापालिका, बांधकाम अन्य विभागाचे दाखले; तसेच सातबारा, प्रॉपर्टी कार्ड यांसारखे पूरक कागदपत्रे अपलोड करावे लागतील. त्याच वेळी दस्तासाठी आवश्यक असलेले मुद्रांक शुल्क भरण्याची सोयही त्या ठिकाणी करण्यात येणार आहे. त्यामुळे स्वतंत्र ‘ई-ग्रास’ या संकेतस्थळावर जाऊन मुद्रांक शुल्क भरून चलन काढावे लागणार नाही. दस्ताचा मजकूर आणि पुरावे ‘अपलोड’ केल्यानंतर त्याच ठिकाणी ‘पे नाऊ’ हा पर्याय दिला जाणार आहे. त्यावर ‘क्लिक’ करून आवश्यक मुद्रांक शुल्क एका क्लिकवर भरता येणार आहे. दस्त आणि त्याचे पुरावे यांचे स्कॅनिंग या प्रक्रियेत आपोआप होणार असल्याने त्याचा त्रास वाचणार आहे.

# विद्यार्थ्यांना व्यावहारिक आणि कौशल्य आधारित शिक्षण मिळावे– राज्य प्रकल्प संचालक आर. विमला

**मुंबई (प्रतिनिधी)**– विद्यार्थ्यांना नियमित शिक्षणाबरोबरच व्यावहारिक आणि कौशल्य आधारित शिक्षण मिळावे यासाठी समग्र शिक्षा, अध्यापन-शिक्षण आणि परिणाम मजबूत करणे (स्टार्स), पीएमश्री आदी केंद्र पुरस्कृत योजनांसह अन्य योजनांची महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत अंमलबजावणी केली जाते. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालक आर. विमला यांनी केले.



समग्र शिक्षा उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी तसेच शैक्षणिक गुणवत्ता या विषयांबाबत पुणे येथे दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. राज्यातील शिक्षण सह संचालक, विभागीय शिक्षण उप संचालक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी, शिक्षण निरीक्षक यांच्यासह राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या कार्यालयातील अधिकारी कार्यशाळेस उपस्थित होते.

श्रीमती आर. विमला म्हणाल्या की, विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक शिक्षण मिळवून देणे हे शासनाचे उद्दिष्ट आहे. यासाठी नियमित शिक्षणाबरोबरच समग्र शिक्षा अंतर्गत पूरक शैक्षणिक साहित्य, प्रयोगशाळा उपलब्ध करून देणे, शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. दिव्यांग बालकांचे शिक्षण, मुलींचे शिक्षण, व्यवसाय शिक्षण, अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षकांचे प्रशिक्षण, विद्यार्थी लाभांच्या योजना, विद्यार्थ्यांची सुरक्षा यांसह विद्यार्थ्यांसाठी वर्गखोली, शाळा बांधकाम, स्वच्छतागृह, विद्युतीकरण, पिण्याचे पाणी आदी सुविधा असल्याची खात्री करावी, याबाबतही त्यांनी निर्देश दिले. राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणमध्ये राज्याच्या प्रगतीचा आलेख, नियमित मूल्यांकन चाचणीमधील प्रगती यावर आपला कृती आराखडा काय असेल याबाबत मार्गदर्शन करून त्यांनी सन २०२४-२५ मध्ये साध्य केलेल्या बाबी आणि २०२५-२६ मध्ये प्रस्तावित करावयाच्या उपक्रमांवरही चर्चा केली.बैठकीस शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक शिक्षण संचालक संपत सूर्यवंशी, शिक्षण संचालक (योजना) महेश पालकर, बालभारतीचे संचालक कृष्णकुमार पाटील आदी उपस्थित होते. त्यांनी वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकामध्ये उपस्थित सर्व अधिकाऱ्यांना सक्रिय सहभाग घेण्याबाबत तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम प्रस्तावित करण्याबाबत मार्गदर्शन केले. कार्यशाळेस शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांनी व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मार्गदर्शन केले.

# विनातिकीट प्रवाशांकडून १०४ कोटी रुपयांचा दंड वसूल

**मुंबई (प्रतिनिधी)** – पश्चिम रेल्वेवरील विनातिकीट प्रवाशांना पकडण्यासाठी विशेष तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. गेल्या नऊ महिन्यात विनातिकीट प्रवाशांना पकडून १०४ कोटी रुपयांची दंडवसुली पश्चिम रेल्वेने केली आहे.



पश्चिम रेल्वे मार्गावरील लोकल, मेल, एक्स्प्रेस, पॅसेंजर ट्रेन, उत्सव विशेष रेल्वेगाड्यांमधून विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांची धरपकड केली जाते. एप्रिल ते डिसेंबर २०२४ या कालावधीत पश्चिम रेल्वेच्या वाणिज्य विभागाने विनातिकीट प्रवाशांना पकडून १०४.४५ कोटी रुपयांचा दंड वसूल केला आहे. त्यात लोकलमधील विनातिकीट प्रवाशांकडून ३३.९८ कोटी रूपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

डिसेंबर २०२४ मध्ये आरक्षित न केलेल्या सामानासह १.८९ लाख विनातिकीट प्रवाशांना शोध घेऊन त्यांच्याकडून १०.९८ कोटी रुपये वसूल केले. त्याशिवाय नोव्हेंबरमध्ये पश्चिम रेल्वेच्या लोकलमध्ये, फलाटावर ८५ हजार विनातिकीट प्रवाशांना शोधून ३.३५ कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. गेल्या आठ महिन्यात धावत्या वातानुकूलित लोकलमध्ये तिकीट तपासणी करून ४५ हजार विनातिकीट आणि सामान्य लोकलचे तिकीट असेलल्या प्रवाशांना पकडून सुमारे १.५१ कोटींचा दंड वसूल केला आहे. दरम्यान प्रवाशांनी कायम योग्य आणि वैध तिकीट घेऊन प्रवास करण्याचे आवाहन पश्चिम रेल्वे प्रशासनाने केले आहे.

## चोरीचा एक कोटी ४३ लाखांचा मुद्देमाल नागरिकांना परत

**मुंबई (प्रतिनिधी)** – कल्याण, डोंबिवली शहरात मागील काही महिन्यांत विविध प्रकारच्या चोऱ्यांचा माध्यमातून नागरिकांचा किमती ऐवज चोरीस गेला होता. यामधील बहुतांशी चोऱ्यांचा तपास करून पोलिसांनी चोरीचा ऐवज चोरट्यांकडून हस्तगत केला. हा सर्व एक कोटी ४३ लाखांचा ऐवज बुधवारी येथील एका कार्यक्रमात तक्रारदार १६२ नागरिकांना परत करण्यात आला.

कल्याण येथील बाजार समितीजवळील साई नंद सभागृह येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला सह पोलीस आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त संजय जाधव, पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, साहाय्यक पोलीस आयुक्त कल्याण घेटे उपस्थित होते.

# अफू विक्री करणारा गजाआड

## राजस्थानातील तरुणाकडून दोन लाखांची अफू जप्त

**पुणे (प्रतिनिधी)** – राजस्थानातून अफू विक्रीसाठी आलेल्या तरुणाला गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने खराडी परिसरात पकडले. त्याच्याकडून दोन लाख २२ हजार रुपयांची अफू, वजनकाटा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. विजयसिंग खिमासिंग राजपुरोहित (वय ३७, रा. क्रांतीपार्क, खराडी, मूळ रा. राजस्थान) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे.

अमली पदार्थ विरोधी पथक खराडी भागात गस्त घालत होते. त्यावेळी संत तुकारामनगर भागातील एका दुकानाजवळ राजपुरोहित थांबला असून, त्याच्याकडे अफू असल्याची माहिती तपास पथकाला मिळाली. पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला पकडले. त्याची झडती घेण्यात आली. तेव्हा पिशवीत दोन लाख २२ हजार रुपयांची १११ ग्रॅम अफू, वजनकाटा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उल्हास कदम, सहायक निरीक्षक अनिकेत पोटे, संदीप शिर्के, मारुती पारधी, प्रवीण उत्तेकर, विशाल दळवी, संदेश काकडे यांनी ही कारवाई केली.

### जाहीर प्रगटन

प्रकरण क्र.आरओ/आरईव्ही/सीआर-१५२/२०२४/एन दि.२७ /११/२०२४

हमदस्त

वादी-१.श्रीनिवास गोविंदराव नरवाडे रा.गुजरी ता.बिलोली जि.नांदेड

प्रतिवादी-१.अप्पर जिल्हाधिकारी नांदेड

२.संभा रामानंद गिरी ३.बुद्धीदास संभाजीराव गिरी

प्रतिवादी क्र.२ व ३ रा.गुजरी ता.बिलोली जि.नांदेड

विषय-सुनावणीस हजर राहाणे बाबत.

श्रीनिवास गोविंदराव नरवाडे विरूद्ध संभा रामानंद गिरी

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अपर जिल्हाधिकारी नांदेड यांचे आदेश क्र.२०२३/आरटीएस-५९/गुजरी(बिलोली)/अपिल/सिआर-१५५ दि.२८/३/२०२४ च्या नाराजीने या न्यायालयात पुनरिक्षण अर्ज दाखल केला आहे.

सदर प्रकरणात पुढील सुनावणी दिनांक १४/१/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.अपर विभागीय आयुक्त-१ छत्रपती संभाजीनगर यांच्या दालनात ठेवण्यात आली आहे. करिता आपण स्वता समक्ष अथवा आपल्या विधिज्ञामार्फत या कार्यालयास हजर राहून आपली बाजू मांडवी.

**(एस.पी.गायकवाड)**
**नायब तहसीलदार अपील-१**

# सायबर चोरट्यांकडून ज्येष्ठ नागरिक ‘लक्ष्य’; बतावणी करुन ३८ लाखांची फसवणूक

**पुणे (प्रतिनिधी)** –सायबर चोरट्यांनी दोन वेगवेगळ्या घटनेत ज्येष्ठ नागरिकांकडे बतावणी करुन ३८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी पर्वती आणि हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले. बँकेतून बोलत असल्याची बतावणी करुन सायबर चोरट्यांनी पर्वती भागातील एका ८० वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकाची १९ लाख ९० हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ज्येष्ठ नागरिकाने याबाबत पर्वती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ज्येष्ठ नागरिक अरण्येश्वर भागात राहायला आहेत. गेल्या महिन्यात १५ डिसेंबर रोजी सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. एका बँकेतील अधिकारी असल्याची बतावणी चोरट्यांनी केली. बँकेकडून डेबिट कार्ड सुविधा अद्ययावत करण्यात येत आहे, अशी बतावणी चोरट्यांनी त्यांच्याकडे केली. त्यानंतर चोरट्यांनी त्यांच्याकडून बँक खात्याची माहिती घेतली. बँक खात्याची गोपनीय माहिती घेऊन चोरट्यांनी त्यांच्या खात्यातून १९ लाख ९० हजार रुपये चोरून नेले. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर ज्येष्ठाने पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल मोरे तपास करत आहेत.

दुसऱ्या एका घटनेत सायबर चोरट्यांनी हडपसर भागातील एका ज्येष्ठ नागरिकाची १८ लाख २५ हजार रुपयांची फसवणूक केली. सायबर चोरट्यांनी २१ डिसेंबर रोजी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला होता. गॅस पुरवठा करणाऱ्या कंपनीचे देयक थकीत असल्याने गॅस पुरवठा खंडीत करण्यात येणार असल्याची बतावणी चोरट्यांनी केली.

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, जाहीर प्रगटन देणार मी सौ. शांताबाई मारोती भालेराव वय ६३ वर्षे, मूळ रहिवासी बोंडार तर्फे हवेली ता. जि. नांदेड हल्ली मु. शाहूनगर हडको नवीन नांदेड येथील रहिवासी असून, माझे पती मारोती पिराजी भालेराव रा. बोंडार तर्फे हवेली यांच्या नावे गट नं. ८ बोंडार तर्फे हवेली येथील जमीन ४०.३४ ही जमीन माझे पती परस्पर विकण्याच्या प्रयत्नात आहेत असे समजले. तेव्हा सदरील गट क्र. ८ मधील जमीन विक्रीस माझा आक्षेप आहे. तरी सदरील जमीन कोणी विकत घेण्याचा प्रयत्न करू नये. माझ्या परस्पर सदरील जमीन विक्री केल्यास या विक्रीस माझा आक्षेप राहील. तसेच या जमिनीसंदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तेव्हा सदर जमीन कोणी विकत अथवा गहाण ठेवून घेण्याचा प्रयत्न करू नये. तसे केल्यास ते स्वतः जबाबदार राहतील करिता हे जाहीर प्रगटन देत आहे. तेव्हा संबंधितांची या जाहीर प्रगटनाची नोंद घ्यावी ही विनंती.

**जाहीर प्रगटन देणार**
**सौ. शांताबाई मारोती भालेराव**
**रा. बोंडार तर्फे हवेली. ह. मु. शाहुनगर, हडको, नांदेड**
**मो. ८२६२०६९४९०**

### जाहीर प्रगटन

श्री संत नामदेव महाराज सहकारी गृहनिर्माण संस्था म. फत्तेजंगपुर ता.जि.नांदेड मध्ये गट क्र.५० मौजे फत्तेजंगपुर ता.जि.नांदेड येथील प्लॉट क्र.३० वर घराचे बांधकाम झालेले असून त्या घरामध्ये ५ रूम व तीन कबाईन बाथरूम आणि पोर्च आहे.हे नांदेड वाघाळा महानगरपालिका क्षेत्रात श्री परशमुराम मण्णाजी बडूरे रा.नामदेव नगर संस्था ता.जि.नांदेड यांच्या मालकी व ताब्यात आहे. ते घर त्यांनी श्री सचिन नामदेव मुंडकर रा.चुडाजीची वाडी ता.कंधार जि.नांदेड यांना कायमचा विक्री केलेला आहे. सदरील घराबाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी संस्थेचे चेअरमन किंवा चिटणीस यांचेकडे सात दिवसाच्या आत मुळ कागदपत्रासह आक्षेप नोंदवावा. या कालावधीत आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे समजून घर हस्तांतरणाची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.करीता हे जाहीर प्रगटन

**अध्यक्ष**
**श्री संत नामदेव महाराज सहकारी गृहनिर्माण संस्था**
**म. फत्तेजंगपुर ता.जि.नांदेड**

# दागिने घेऊन महिला पसार

**मुंबई (प्रतिनिधी)**– कमी किंमतीत सोन्याचे दागिने देण्याचे अमिष दाखवून एका महिलेने कुर्ल्यातील गृहिणीचे खरे दागिने घेऊन पोबारा केला. याप्रकरणी गृहिणीने घाटकोपर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

कुर्ला (प.) येथे वास्तव्याला असलेल्या निर्मला (३५) ३ जानेवारी रोजी मुलांना शाळेत सोडण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी त्यांना रस्त्यात एक महिला भेटली. आपल्याकडे मोठ्या प्रमाणात सोन्याचे दागिने असून ते ट्रेनमध्ये सापडल्याचा बनाव सदर महिलेने केला.

### जाहीर प्रगटन

संचिका क्रमांक. १४५/४०/क्षे.का.क्र.६ (सिडको)/२०२४ २०२५

प्रकरण :- नांव परिवर्तन करणे बाबत.

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री. रमेश सिताराम राठोड रा.हडको नांदेड यांनी या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की,मनपा सिडको घर क्र.११-९-४८७ पिन क्र.४०५११०३७७७ गट नंबर ए-११६/एल/५८/४ एकूण क्षे.४०.२५ चौ.फुट ज्याचा मनपा मालमत्ता क्र.११-९-४८७ पि.क्र. ४०५११०३७७७ श्रीमती आशा परसराम राठोड यांच्या नावे नोंद असलेली मालमत्ता यांचेकडून अर्ज खरेदी खत क्र./ विक्रीखत / ओर्नसशिप पद्धतीने दस्त क्र.४४२८ दि.१-८-२०१८ व सिडको प्रशासन भाडे पट्टा हस्तातंरण आदेश क्र. ४५९ दि.१८-९-२०१८ अधारे प्राप्त झाली आहे. तरी त्यांचे नाव करी आकारणी नोंद वहीत घेणेसाठी जाहीर प्रगटन देण्यात येत आहे. तरी यां संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहित दाखल करावा.अन्यथा अवधी संपल्यांनतर अर्जदाराच्या नावे वरील प्रमाणे मालमत्ता नोंदविण्यात येईल.चर्तु:सिमा :-पुर्वेस -ड्रेनेज लाईन,पश्चिमेस -पाथवे,दक्षिणेस- घरनंबर ए- ११६/एल/५८/०३, उत्तरेस -घरनंबर ए-११६/एल/५८/०४

**क्षेत्रीय अधिकारी**
**क्षेत्रीय कार्यालय क्र. ६सिडको,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,**

## पाणी आडवा पाणी जिरवा




**Availabe For Sale**

As IN Where in Condition Tractor Tafe 9500 Smart Model-2023 MH-26-CE-3255 ADD-Sundram Finance LTD.No.12 Parmar Complex 2nd Floor Near Bafna T Point Hingoli Road Nanded-431601 Ph-(02462) 249649, 240860

**Availabe For Sale**

As IN Where in Condition Tractor Escorts Kubota Farm trac 50 Power Max -2022 MH-26 - CE -0268 ADD-ADD-Sundram Finance LTD.No.12 Parmar Complex 2nd Floor Near Bafna T Point Hingoli Road Nanded- 431601 Ph-(02462) 249649, 240860

### प्रमाणपत्र हरवले

माझे शंकर रामराव वडमिले वय ५० वर्ष व्यवसाय मजुरी रा. किनाळा ता. बिलोली जि. नांदेड येथील रहिवाशी आसुन दि.५ जानेवारी नांदेड ते किनाळा बस प्रवासा दरम्यान प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र शंकर रामा वडमिले या नावाचे तळणी वृलपा प्रकल्पाचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र जिल्हाधिकारी नांदेड यांनी दि. ३०/०७/२००१ रोजी दिलेले प्रमाणपत्र बस प्रवासा दरम्यान हरवले आहे. वरील प्रमाणपत्र कोणाला सापडल्यास मोबाईल संपर्क **साधावा मो.७४९८७९९०६२**

### जिल्हा परिषद बांधकाम विभाग नांदेड निविदा सुचना क्र.२१(२०२४-२५)

जिल्हा परिषद बांधकाम विभाग नांदेड अंतर्गत निविदा सुचना क्र.(https://mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर प्रसिद्ध आली आहे.

**कार्यकारी अभियंता**
**जिल्हा परिषद बांधकाम विभाग नांदेड**

### जाहीर प्रगटन

**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**

क्रमांक २०२४-आरबी-१-डेस्क-२-टे-५/१-RONOC-प्र.क्र.७२दि. ०८.०१.२०२५

एक्सप्लोझीव नियम, २००८ चे कलम १०३ (३) (अ) नुसार

विषय:नियोजित गट क्रं.७६३ (भाग) मौजे बडूर ता. बिलोली जि.नांदेड येथे नविन रिटेल आऊटलेटसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत

संदर्भ:- मुख्य प्रादेशिक व्यवस्थापक (किरकोळ), हिंदुस्थान पेट्रोलियम कॉ. लि. सोलापूर यांचे पत्र HPCL-SOLPUR/BDUR/NOC, दिनांक २२-०८-२०२४

मुख्य प्रादेशिक व्यवस्थापक (किरकोळ), हिंदुस्थान पेट्रोलियम कॉ.लि. सोलापूर यांनी मौ. बडूर ता.बिलोली जि.नांदेड येथील गट क्रं. ७६३ (भाग) मध्ये नविन रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी या कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. प्रस्तुत ठिकाणी रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी कंपनीने श्री . गंगाधर रामलू गडपवार रा. गांधीनगर ता. बिलोली जि.नांदेड यांना डिलरशिप दिलेली आहे.सदरील पेट्रोलपंप उभारायचा भुखंड ( गट क्रं. ७६३ (भाग) मौजे बडूर ता. बिलोली जि.नांदेड हा श्री. गंगाधर रामलू गडपवार यांच्या मालकीचा आहे. सदर जमिनीचे एकूण क्षेत्र ५१ आर इतके आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित जागेत हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, सोलापूर यांना नविन रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड येथे हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन पंधरा (१५) दिवसाचे आत लेखी आक्षेप / हरकती कार्यालयीन वेळात समक्ष सादर कराव्यात मूदती नंतर प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. मूदतीत प्राप्त आक्षेप / हरकती सुनावणी घेऊन अंतीम करण्यात येतील याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

**(महेश वडदकर)**
**अपर जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

**प्रतिलिपी** – १) तहसिलदार, बिलोली यांना देऊन कळवीण्यात येते की, सदर जाहीर प्रगटण तहसिल कार्यालय/संबंधीत मंडळ अधिकारी कार्यालय/सबंधीत तलाठी कार्यालयाचे नोटीस बोर्डवर डकवुन, प्रसिध्दी देऊन, जाहिर प्रगटन प्रसिध्दी पंचनामा अहवाल या कार्यालयास आठ दिवसात उलट टपाली पाठविण्यात यावा.

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गट्टूम मार्केट, पहिला मजला, शिवाजी नगर, नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# साहित्य व तत्त्वज्ञानामुळे माणूस विवेकवादी

## स्वारातीम विद्यापीठातील प्रकट मुलाखतीत कवयित्री नीरजा यांचे प्रतिपादन



**नांदेड (प्रतिनिधी)** – आजच्या काळात आपण संस्कृतीच्या व्याख्या खूप संकुचित केल्या आहेत. मुळात संस्कृती हा खूप व्यापक पट आहे. संस्कृतीमध्ये केवळ धर्म आणि सण-उत्सवाच्या परंपराच नसतात, तर संस्कृतीत साहित्य, कला, तत्त्वज्ञानही सामावलेले असते. हे तत्त्वज्ञान माणसाला विवेकवादी आणि रॅशनल बनवते. एवढेच नव्हे तर साहित्य, स्थापत्यकला, चित्रकला, शिल्पकला या कलासुद्धा संस्कृतीचाच भाग असतात. आज आपण वैचारिकदृष्ट्या खूप मागे चाललो आहोत. आपली भाषादेखील बदलत चालली आहे. अशावेळी माणूसपणाकडे घेऊन जाणारी मूल्ये साहित्यातून पाझरायला हवीत. कारण साहित्यामुळे माणूस विवेकवादी बनतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवयित्री नीरजा (मुंबई) यांनी केले.

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भाषा, वायय व संस्कृती अभ्यास संकुल आणि ज्ञान स्रोत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या विशेष मुलाखतसत्रात त्या बोलत होत्या. प्रसिद्ध कवी पी. विठ्ठल यांनी त्यांची प्रकट मुलाखत घेतली. यावेळी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा मराठीतील ज्येष्ठ लेखक भारत सासणे हेदेखील उपस्थित होते. नीरजा पुढे म्हणाल्या की, 'साहित्याचे काम करमणूक करण्याचे नाही, तर माणसाला जागवण्याचे असते. वैचारिकदृष्ट्या जागवण्याचे किंवा भान आणून देण्याचे काम साहित्य करत असते. त्यामुळे आपण चांगली पुस्तके वाचायला हवीत. नाटक आणि सिनेमदेखील बघायला हवेत. त्यामुळे आपल्यापासून दूर असलेल्या जगाचा आपल्याला परिचय होऊ शकतो. स्त्रीमुक्ती चळवळ आणि स्त्रीवादावर बोलताना त्या म्हणाल्या की, 'आपल्याकडे स्त्रीच्या सहनशीलतेचे, मातृत्वाचे खूप उदात्तीकरण केले गेले आहे. एवढेच नाही तर अजूनही काही गोष्टीत पुरुषांचीच मक्तेदारी आहे. बोलणाऱ्या किंवा लिहिणाऱ्या स्त्रिया पुरुषसत्ताक व्यवस्थेला नको असतात. लेखिका म्हणून मी समाज व्यवस्थेबद्दल आणि गोष्टींबद्दल सतत लिहीत आणि बोलत आले आहे.

यावेळी भारत सासणे यांनी 'साहित्य आणि माध्यमांतर' याविषयी भाष्य केले. प्रारंभी भाषा संकुलाचे संचालक डॉ. दिलीप चव्हाण आणि ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी नीरजा आणि सासणे यांचे स्वागत केले. यावेळी संकुलातील डॉ. रमेश ढगे, डॉ. पृथ्वीराज तौर, डॉ. वैजनाथ अनमुलवाड, डॉ. योगिनी सातारकर, डॉ. नीना गोगटे, डॉ. राजेंद्र गोणारकर यांच्यासह विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती.

# 'मिशन १०० डे ' अंतर्गत जिल्ह्यात सात कलमी कार्यक्रमांची धडाकेबाज अंमलबजावणी सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या ७ कलमी कार्यक्रमाच्या 'मिशन १०० डे ' अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील यंत्रणा कार्यान्वित केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत ७ जानेवारी रोजी आयोजित व्हिडिओ कॉन्फरन्सिंग नंतर जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांना जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी लेखी आदेश दिले. यामध्ये प्रामुख्याने खालील सात सूत्रांचा वापर करण्यात आला आहे.



**वेबसाईट अद्यावत करणे:** जिल्ह्याच्या अधिकृत वेबसाईटचा दर्जा सुधारून ती माहितीपूर्ण आणि नागरिकांसाठी उपयुक्त करण्यावर भर दिला जाणार आहे.

**इज ऑफ लिविंग वाढविणे:** नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी करण्यासाठी, विविध सेवांचे सुसूत्रीकरण व सरळीकरण करण्याचे आणि समस्यांवर सोयीस्कर उपाययोजना हाती घेतल्या जातील.

**कार्यालयीन स्वच्छता:** सुंदर माझे कार्यालय या शासन निर्णयाप्रमाणे प्रशासनातील प्रत्येक कार्यालय स्वच्छ, सुटसुटीत आणि कार्यक्षम ठेवण्यासाठी स्वच्छता मोहीम राबवली जाईल.

**तक्रार निवारण:** नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी तक्रार निवारण यंत्रणा अधिक प्रभावी केली जाणार आहे. यासाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही पद्धतींचा वापर केला जाईल.

**सोयीसुविधा वाढविणे:** नागरी सुविधा सुधारण्यासाठी ठोस पावले उचलली जातील. शासकीय कार्यालयामध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करणे कार्यालयातील स्वच्छतागृहे अद्यावत ठेवणे कार्यालयामध्ये अभ्यास कक्ष निर्माण करणे कार्यालय परिसराचे सुशोभीकरण करण्याचे निर्देश देण्यात आले आहे

**गुंतवणूक प्रोत्साहन:** जिल्ह्यात गुंतवणूक वाढविण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यात येणार आहे. स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देणे आणि नवीन उद्योगांची स्थापना करण्यासाठी विशेष धोरणे आखली जातील. तातडीने सर्व परवाने संबंधितांना उपलब्ध होतील कुठेही अडवणूक होणार नाही याबाबत दक्ष राहण्याची सूचना त्यांनी केली आहे.

# राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – राष्ट्रमाता जिजाऊ जयंती निमित्त छावा श्रमिक संघटना व जिजाऊ प्रतिष्ठानच्यावतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात स्पर्धा परीक्षा, दार्शनिक सहल, शैक्षणिक साहित्य व ग्रंथांचे वाटप, अन्नदान आदी कार्यक्रम घेतले जाणार आहेत.



दि. ६ ते १० जानेवारी दरम्यान शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा घेतली जाणार आहे. दि. १२ रोजी 'चलो मातृतीर्थ सिंदखेड राजा' बुलढाणा येथे दार्शनिक सहल, १५ रोजी जिजाऊ नर्सिंग स्कुलमध्ये जिजाऊ ग्रंथांचे वाटप करण्यात येणार आहे.

दि. १९ रोजी मुसलमानवाडी येथील बालकाश्रमात फळे व शैक्षणिक साहित्य, हिवाळी साहित्य वाटप व अन्नदान करण्यात येणार आहे. सिडको येथील जिजाऊ ज्ञानमंदिरात २२ जानेवारी रोजी कर्तृत्ववान महिलांचा जिजाऊ, सावित्रीबाई फुले ग्रंथ देऊन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे, अशी माहिती आयोजक छावा श्रमिक संघटना मराठवाडा अध्यक्ष तथा जिजाऊ प्रतिष्ठांचे संस्थापक भास्करराव हंबर्डे, प्रा. ममता पाटील, जयसिंगराव मोरे यांनी दिली आहे.

या उपक्रमासाठी उत्तम हंबर्डे, प्रमोद गाडेकर, उदयसिंह कच्छवे, लक्ष्मीकांत पत्तेवार, प्रा. नरेंद्र वानखेडे, तुकाराम बेस्ते, संतोष शिंदे, संतोष बारसे, खुशालराव कळकेकर, नवनाथ औराळकर, शिलानंद कांबळे, सुरेश कंधारे परिश्रम घेत आहेत.

# गुंठेवारीला मुदतवाढ : आ. बोंढारकर यांच्या प्रयत्नांना यश

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात गुंठेवारी करण्यासाठी आ. आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांनी पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला यश आले असून गुंठेवारी करण्यासाठी ३१ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.



नांदेड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात करण्यासाठी दि. ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदत देण्यात आली होती. या कालावधीनंतर अनेक प्लॉट मालकांना आणि मालमत्ता धारकांना गुंठेवारी करण्याची इच्छा असूनही नाईलाजास्तव गुंठेवारी करता आली नाही. त्यामुळे अनेकांची प्लॉट खरेदी विक्रीचे व्यवहार ठप्प होते तर अनेकांना आपले घर बांधण्यासाठी अडचणी आल्या होत्या. ही बाब लक्षात घेता नांदेड महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ताधारकांना दिलासा देण्याचे अनुषंगाने पुन्हा एकदा गुंठेवारी सुरू करावी या अनुषंगाने आ. बोंढारकर यांनी आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांच्याशी चर्चा केली. यासाठी महानगरपालिकेच्या सर्व विभागाच्या वरिष्ठांची त्यांनी दि. २६ डिसेंबर २०२४ रोजी बैठक बोलावली होती. या बैठकीत मालमत्ताधारकांना दिलासा द्यावा अशा सूचना त्यांनी केल्या होत्या. आ. बोंढारकर यांनी केलेल्या मागणीला यश आले असून महानगरपालिकेने आता ३१ जानेवारी २०२५ पर्यंत गुंठेवारीसाठी मुदतवाढ दिली आहे. ९ जानेवारीपासून प्रस्ताव दाखल करता येतील. ३१ जानेवारी पर्यंत मालमत्ता धारकांनी प्रस्ताव दाखल करावेत, असे आवाहन आ. आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांनी केले आहे.

# डॉ. सुधीर रसाळ यांचा नांदेडमध्ये अभिवंदन सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)**– मराठीतील अग्रणी समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांच्या 'विंदांचे गद्यरुप' या समीक्षा ग्रंथाला साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मराठवाडा साहित्य परिषदेच्या नांदेड आणि पळसा या शाखांच्या वतीने त्यांचा अभिवंदन सोहळा शनिवारी येथे आयोजित करण्यात आला आहे.



जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवनाच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रसाळांचेच विद्यार्थी राहिलेले सुप्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव यांच्यासह मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम हे उपस्थित राहणार असून रसाळ यांना मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. सायंकाळी ५.३० वाजता हा कार्यक्रम सुरू होईल. वरील कार्यक्रमास साहित्यिक आणि साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मसाप कार्यकारी मंडळाचे सदस्य संजीव कुळकर्णी, देवीदास फुलारी, डॉ.हेमलता पाटील तसेच नांदेड शाखेच्या प्रभाकर कानडखेडकर, प्रा.महेश मोरे, बालाजी इबितदार आणि शंतनू डोईफोडे यांनी केले आहे.

# माळेगाव यात्रेत पुन्हा दोघांवर प्राणघातक हल्ला; पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– माळेगाव यात्रेत दोघांवर मोहन पोले व त्याच्या इतर चार साथीदारांनी प्राणघातक हल्ला केला. ही घटना चार जानेवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास घडली.

माळेगाव यात्रेतील महादेव मंदिराजवळून सूर्यकांत बाबुराव गायकवाड (वय ३५, रा. पार्डी, ता.लोहा) आणि त्याचा एक मित्र विष्णू मोरे हे दोघेजण आनंदराव पाटील शिंदे यांच्यावर आरोपी मोहन पोले व त्याच्या चार साथीदारांनी (सर्व रा. रामतीर्थ ता. लोहा) सूर्यकांत गायकवाड याच्या डोक्यात लोखंडी मेकाने मारून ठार मारण्याचा प्रयत्न केला. यावेळी मध्यस्थी करणारा विष्णू मोरे यालाही थापडबुक्याने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. जखमी सूर्यकांत गायकवाड याच्यावर नांदेडच्या विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सूर्यकांत गायकवाड याच्या फिर्यादीवरून माळाकोळी पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक राणी भोंडवे करत आहेत.

# सीमावर्ती भागातील रस्त्यांचा विकास करा

## खा.डॉ. गोपछडे यांची केंद्रीय बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**–महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक सीमेलगत असलेल्या रस्त्यांचा विकास करा. त्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे केली आहे.



जिल्ह्यातील देगलूर, बिलोली, मुखेड, नायगाव या तालुक्यांचा तेलंगणा, कर्नाटकशी दैनंदिन संबंध येतो. असे एकूण चार तालुके आहेत. देगलूरच्या कार्यक्षेत्रात प्रमुख राज्य मार्ग ११३.१५ किलोमीटर, राज्यमार्ग ३१२.१० किलोमीटर आणि प्रमुख जिल्हा मार्ग १४०.२० किलोमीटर या रस्त्यावर २३ मोठे पूल, ९५ छोटे पूल आणि २७२८ नळकांडी फुल आहेत. बिलोली तालुक्यातील २ रस्ते राज्य सीमेला जोडणारे असून यांची लांबी ५० किलोमीटर इतकी आहे. सद्यस्थितीमध्ये या रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झालेली आहे. त्यामुळे दळणवळणास अडचणी निर्माण होत आहेत. सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम करणे अत्यंत गरजेचे असल्यामुळे या दोन्ही तालुक्यातील सीमावरती भागातील रस्त्यांच्या विकासासाठी केंद्र सरकारने भरीव निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केली आहे. सीमावर्ती भागातील गावांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्रीय मंत्र्यांकडे मागणी करणारे ते पहिले खासदार ठरले आहेत.



**नांदेड** : मीमांसा फाउंडेशन, दैनिक समीक्षा, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मंथन क्रिएटिव्ह ग्रुप, पत्रकार प्रेस परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकारिता पुरस्कार सोहळा २०२५ नुकताच पार पडला. या सोहळ्यात वृत्तपत्र क्षेत्रातील तिसरा डोळा उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार छायाचित्रकार नरेंद्र गडप्पा यांना आमदार हेमंत पाटील व खासदार प्रा. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंद बोंढारकर, आमदार बाबुराव कदम कोहळीकर, हिंदुस्तान टाइम्स मुंबईचे सुरेंद्र गांगण, मॅक्स महाराष्ट्र मुंबईचे मनोज भोयर, जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके, दैनिक समीक्षाचे मुख्य संपादक रुपेश पाडमुख, अभय दांडगे, रमेश पांडे, अरविंद जाधव, सखाराम कुलकर्णी, रामेश्वर धुमाळ, ज्ञानोबा पवार, उज्वला दर्डा आदी उपस्थित होते.

अर्जंट लोन अर्जंट लोन अर्जंट लोन अर्जंट लोन
सभी नॅशनल बैंको से आजही लोन लेने के लिये हम से संपर्क करे
प्रोप्टी खरीदी करीता लोन
डॉ. शेख फैसल
9284223649
9075223649
पता मस्जीद मंढई के पास चौपाला, नांदेड.
Property PurchesLoan
अर्जंट लोन
Bike Loan
Home Loan
Bussiness Loan
Mortgage Loan
Car Loan
Personal Loan
Credit Card Loan
अर्जंट लोन अर्जंट लोन अर्जंट लोन अर्जंट लोन

# बिलोली बसस्थानकावर महिलेचे मंगळसूत्र लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)** – बिलोली येथील बसस्थानकावर एका महिलेच्या गळ्यातील ३५ हजार रुपये किंमतीचे सात ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने चोरून नेले. ही घटना आठ जानेवारी रोजी दुपारी दीडच्या सुमारास घडली.

चोंडी हसनाळ (ता. मुखेड) येथील शांताबाई मारुती पीदके ह्या देगलूरला जाण्यासाठी बिलोली-देगलूर बसमध्ये चढत होत्या. यावेळी गर्दीचा फायदा घेऊन चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरून नेले. शांताबाई पीदके यांच्या फिर्यादीवरून बिलोली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार मुद्देमवार करत आहेत.

# राज्यस्तरीय सिनियर वुशू स्पर्धेचे थाटात उद्घाटन



**नांदेड (प्रतिनिधी)**– यशवंत महाविद्यालयाच्या स्पोर्ट कॉम्प्लेक्समध्ये २२ व्या राज्यस्तरीय सिनियर महिला व पुरुष पुरुष स्पर्धा संपन्न झाली. लंगर साहिब गुरुद्वाराचे संत बाबा बलविंदरसिंघजी व आमदार श्रीजया अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी शिवा संघटनेचे अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेला ऑल महाराष्ट्र वुशू संघटनेचे सचिव एस.एस. कटके यांची विशेष उपस्थिती होती. तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे प्रवक्ते तथा पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे, भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश सरचिटणीस डॉ. शितल भालके, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे, भाजपच्या अल्पसंख्याक महिला मोर्चाच्या मराठवाडा प्रमुख सरदारनी मनमोहन कौर जंगी, माजी नगरसेवक दुष्यंत सोनाळे, नांदेड जिल्हा वुशू संघटनेचे अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य, इंजिनिअर अनिल माळगे, विठ्ठल ताकबिडे यांची उपस्थिती होती.

नांदेड जिल्हा वुशू संघटनेचे अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य, सचिव डॉ. राजेश जांभळे सहसचिव तथा मुख्य प्रशिक्षक डॉ. प्रमोद वाघमारे यांनी या स्पर्धेचे आयोजन केले.

स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी वुशू या खेळाची प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तर नंतर दीपप्रज्वलन करून विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक स्वरूपात सादरीकरणानंतर या स्पर्धेला सुरुवात झाली. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील जवळपास सर्वच जिल्ह्यांचा सहभाग होता.

# इंदरबाई तरगुडे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– जिरगा (ता. मुखेड) येथील ज्येष्ठ महिला इंदरबाई संतुकराव तरगुडे (वय ९५) यांचे दि.८ जानेवारी रोजी सायंकाळी ७:४५ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि.९ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सूना, तीन मुली, जावई, नातू, पणतू असा परिवार आहे. पोलीस पाटील सुनील तरगुडे, सहशिक्षक प्रदीप तरगुडे, रेशन दुकानदार अनिल तरगुडे, अभियंता संदीप तरगुडे यांच्या त्या आजी होत.

# सुलोचना यन्नावार यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील ज्येष्ठ महिला सुलोचना देविदास यन्नावार (वय ९५) यांचे गुरुवारी दि. ९ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्या पार्थिवदेहावर शुक्रवारी दि. १० जानेवारी रोजी सकाळी १० वाजता गोवर्धन घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात २ मुले, ४ मुली असा परिवार आहे. डॉ. श्रीधर यन्नावार यांच्या त्या मातोश्री तर प्रा. विमल यन्नावार यांच्या त्या सासू होत.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com